
साप्ताहिक

# माणूस

शनिवार । १९ जानेवारी १९८० । ७५ पैसे




**शिवाय : एका नष्ट झालेल्या प्रदर्शनाच्या निमित्ताने....**

□ अंधश्रद्धांवर हल्ला चढविणारा लेख ( पृष्ठ....११ )

पुन्हा एकवार इंदिराजीचा अंमल सुरू झाला आहे.
जनतेने त्यांच्या पाठीशी तीनशेएकावन्न खासदारांचं भक्कम बळ उभं केलं आहे.
दुबळा विरोधी पक्ष हे भारतीय लोकशाही शासनाचं वैशिष्टचही कायम राहिलं आहे.
फक्त अडीच वर्षात हे का घडलं ?
कसं घडलं ?
आता इंदिराजी काय घडवतील ?
की सत्ताच त्यांचाही घास घेईल ?

# जनसत्ता — सत्तांतर आणि नंतर....

विजय कुवळेकर

अखेर पुन्हा एकदा दिल्लीच्या तख्तावर श्रीमती इंदिरा गांधी विराजमान झाल्या आहेत !

१९७७ साली इदिरा गांधीच्या हातून सत्ता हिसकावून घेऊन जनता पक्षाला सत्तेवर आणणाऱ्या जनतेनंच जगातली ही सर्वात मोठी लोकशाही पुन्हा एकदा इंदिरा गाधीच्याच हाती सोपविली आहे. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधीचा दारूण पराभव झाला होता. आता, अवघ्या तीन वर्षातच झालेल्या निवडणुकीत त्यांनी या पराभवाचं प्रचंड विजयात रूपांतर घडविण्याची किमया केली आहे. जनतेनं त्याच्या नेतृत्वावर पूर्वीपेक्षाही प्रचंड विश्वास व्यक्त करून त्यांना हुकमी बहुमत दिलं आहे. आणि हे सारं सहजासहजी घडलेलं नाही, हे उघडच आहे गेल्या तीन वर्षामधले भारतीय राजकारणातले अनेक प्रश्न आणि प्रवाह या सत्तातराला (प्रामुख्यानं) कारणीभूत ठरले आहेत. हे सत्तातर त्यांचं सर्वोच्च आणि दृश्य फल मानावं लागेल. पण तिथेच त्याची अखेर मात्र मानता येणार नाही. कारण या सत्तांतरातूनही अनेक नवे प्रश्न आणि प्रवाह निर्माण झाले आहेत. परस्परावलंबी अशी ही प्रक्रिया आहे. जनता पक्षाच्या सत्तेच्या प्रारंभातच या प्रक्रियेचा प्रारंभही सामावलेला आहे. जनता पक्षाच्या स्थापनेबरोबर ती निर्माण झालेली नाही, तर जनता पक्षाला सत्ता मिळाल्यानंतर तिचा उगम झाला आहे.

जनता पक्षाची स्थापना एका भारलेल्या आणि गतिमान अशा वातावरणात झाली होती. इंदिरा गाधीच्या एकतंत्री एकाधिकार

साप्ताहिक माणूस
वर्ष : एकोणिसावे
अंक : चौतिसावा
१९ जानेवारी १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

शाही कारभारानं आणीबाणीत भरडून निघालेले विरोधी पक्ष एकत्र आले होते. जयप्रकाश नारायण याच्यासारख्या निःस्पृह नेत्याची प्रेरणा त्याच्यामागे उभी होती. आणीबाणीच्या रूपानं भारतीय लोकशाहीच्या गळ्याभोवती फास टाकला गेला होता. तो आवळला जाण्यापूर्वीच विरोधी पक्षाना जयप्रकाशजीनी जवळ आणलं होत. सर्व विरोधी पक्षानी एकत्रितपणे लढा दिला तरच लोकशाही टिकू शकेल आणि ती टिकली तरच विरोधी पक्षाचं अस्तित्वही टिकू शकेल, हा त्याचा विचार स्वीकारणं विरोधी पक्षांना परिस्थितीनंच भाग पाडलं होतं. आणीबाणीतल्या अत्याचारानी (विशेषतः उत्तर भारतातली ) जनता हैराण झाली होती. इंदिरा गांधीच्या सत्ते-बद्दलची चीड जनतेच्या मनात निर्माण झाली होती. या साऱ्या वातावरणात जनता पक्ष उभा राहिला जनसंघापासून समाजवादी पक्षापर्यंत अगदी परस्परविरोधी धोरणं आणि तत्त्वं असणारे पक्ष परिस्थतीच्या दबावाखाली मतभेद विसरून एक झाल्याचं अनोखं दृश्य जनसामान्यापुढे अनेक आशा निर्माण करून गेलं. निवडणुकीत त्यांनी भरघोस यशाचं माप जनता पक्षाच्या पदरात टाकून त्याला सत्तेची वाट मोकळी करून दिली. तिथेच जनता पक्षाच्या घटक पक्षामधल्या दुराव्याला प्रारंभ झाला. हा दुरावा जसा वाढत गेला तसतसं दिल्लीचं सिंहासन इंदिरा गाधीच्या समीप येत गेलं.

'जनता पक्ष ही परस्परविरोधी अशा अनेक पक्षाची खिचडी आहे. ते फार काळ एकत्र राहणार नाहीत,' अशो हाकाटी १९७७ च्या निवडणुकीच्या वेळी इंदिरा गाधी करीत होत्या. पण त्यावेळी जनतेनं त्याकडे लक्ष दिलं नाही. कारण खरोखरच जनतेचा एवढा पाठिंबा लाभल्यावर आणि त्यामुळे सत्ता हाती आल्यामुळे तरी हे पक्ष एकमेकाना धरून राहतील, सत्तेचं सूत्र तरी त्याना एकत्र बांधून ठेवील, अशी जनतेची अपेक्षा होती. पण दुर्दैवानं ती खरी ठरली नाही. इंदिरा गांधीनी प्रचारी भूमिकेत केलेली जनता पक्षा-वरची टीका खरी ठरली. आवळ्या-भोपळ्यांची ही मोट फुटू लागली. सत्ताही त्यांना एकत्र ठेवू शकली नाही.

सत्तेच्या प्रारंभीच्या काळात भारतीय लोकदल आणि जनसंघ हे दोन प्रमुख नि प्रभावी घटक पक्ष एकत्र होते. त्यामुळे चरणसिंग आणि जनसंघनेते याच्यात सलोखा होता. समाजवादी पक्षासारखे इतर घटक या युतीनं धास्तावलेले होते, नाराज होते. पंतप्रधान-पदाच्या शर्यतीत मोरारजी देसाई, जगजीवनराम आणि चरणसिंग उतरले तेव्हाच जनता पक्षातले हे तीन सत्तास्पर्धक आणि त्याचे गट झगडत राहणार, हे स्पष्ट झालं. जयप्रकाशजी आणि आचार्य कृपलानी याच्या मध्यस्थीमुळे त्यावेळी वाद ( वरकरणी ) मिटला आणि मोरारजीभाई पंतप्रधान झाले आपोआपच चरणसिंग आणि जग-जीवनराम असतुष्ट राहिले. जगजीवनराम यानी त्यावेळी केलेले रूसवे-फुगवे खूपच गाजलेही होते. चरणसिंग यांनी मात्र त्यावेळी असे काही मान पानाचे खेळ केले नव्हते. ( पण गमत म्हणजे नंतरच्या काळात बाबूजीनी मान-पान फारसे केले नाहीत आणि चरणसिंग यांनी या खेळाशिवाय दुसर काही केल नाही. ) जनसंघ भा. लो. द. एक असूनही त्यावेळी पंतप्रधानपदासाठी चरणसिंगांना जनसंघानं साथ दिली नाही. हे शल्य चरणसिंगाच्या मनात सतत राहिलं. पण सत्तेचे हिशेब माडून ते गप्प राहिले. पुढे जनता पक्षानं कॉंग्रेस सत्तेवर अस-लेल्या राज्यामधल्या विधानसभा विसर्जित करून नव्यानं निवडणुका घेतल्या त्यावेळीही जागा-वाटपावरून जनसंघ-भा. लो. द. मध्ये काही मतभेद झाले होते. पण जागा-वाटपापेक्षा पुढच्या सत्तावाटपाला जास्त महत्त्व देऊन दोन्ही पक्ष एक राहिले. पंतप्रधानपदाच्याबाबतीत बाबूजीही दुखावले होते. पण त्यानी चरणसिंगाशी कधीही जवळीक मात्र साधली नाही. या तीनही नेत्यांमधली मतभेदाची आणि व्यक्ति-गत शत्रुत्वाची दरी कधीही मिटली नाही, उलट ती रुंदावतच गेली.

## घटकवादाने पछाडलेलं सत्ताकारण

विधानसभा निवडणुकीनतर जनसंघ आणि भा. लो. द. यानी उत्तर भारतातली राज्यं अक्षरशः वाटून घेतली. त्यात इतर एकाही घटकपक्षाच्या वाटयाला मुख्यमंत्रीपद आलं नाही. त्यामुळे ते गट नाराज झाले. याच वेळी समाजवादी पक्ष आणि जनसंघ याच्यातली तेढ वाढायला लागली. जनसंघ आणि भा. लो. द. याच्यातही चरणसिंगाना पंतप्रधानपदी आणण्यावरून मतभेद वाढायला लागले. पंतप्रधानपदाच्या शर्यतीत जनसंघ मोरारजीभाईंच्या पाठीशी राहिला. त्यामुळे चरणसिंग त्याच्यापासुन दुरावले आणि त्याबरोबर भा. लो. द.–समाजवादी अशी नवी जवळीक सुरू झाली. बाबूजीनाही जनसंघ जवळचा वाटायला लागला. मोरारजीना तर तो जवळ होताच.

अटलबिहारी वाजपेयीसारखे जनसंघाचे नेते आणि चंद्रशेखर यांच्यासारखे पूर्वाश्रमीचे कॉंग्रेस–नेते हे अंतर्गत मतभेद दूर करण्याचे प्रयत्न करीत होते. प्रारंभीच्या काळात काही प्रमाणात समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडिस याचीही या प्रयत्नाना साथ होती. पण राज-नारायण आणि मधु लिमये यांनी हे प्रयत्न यशस्वी होऊ दिले नाहीत. आगीत तेल ओतण्याचाच प्रकार या दोघांनी केला. वैयक्तिक महत्त्वाकांक्षेनं झपाटलेले चरणसिंग त्यांच्याबरोबर वहावत जायला लागले तसतसा जनसंघ–भा. लो. द. दुरावा वाढत गेला आणि एका बिंदूला तो न मिटण्याइतक्या अंतरावर जाऊन ठेपला. परस्पराच्या मुख्यमंत्र्याना खाली खेचण्याचे डावपेच सुरू झाले. भा. लो. द. ला त्यात फारस यश आलं नाही. पण जनसंघाला मात्र त्यात बरंच यश आलं. केंद्रीय नेतृत्वानंही या प्रश्नात चरणसिंगाकडे फारसं न्यायाचं माप टाकलं नाही. अप्रत्यक्षपणे त्यांनी जनसंघालाच साथ दिली. मोरारजीभाईसारख्यानी या प्रश्नाचा विचार पक्षीय किंवा राष्ट्रीय दृष्टिकोनातून न करता बराचसा वैयक्तिक पातळीवरूनच केला

त्यामुळे पक्षातला एकोपा वाढण्याऐवजी दुफळी वाढायलाच ' मदत ' झाली. अटलबिहारीसारख्या नेत्यानं याबाबतीत संयमाची आणि समजुतदारपणाची भूमिका घेऊन पक्षकार्याला महत्त्व देण्यासाठी सत्तेबाहेर पडण्याची तयारी दर्शवली होती. पण जनसघाच्या इतर नेत्यानी आणि कार्यकर्त्यांनी त्यांना साथ दिली नाही. उलट डॉ. सुब्रह्मण्यम् स्वामीसारखे खासदार उघडपणे त्याना विरोध करायला लागले. त्यामुळे अटलजीचा प्रयत्न अध्यविरच राहिला.

### राजनारायण, लिमये आणि संघ-जनसंघ

दरम्यान, राजनारायण आणि मधू लिमये अक्षरशः मूळ पक्षाचा वृक्ष तोडायला कुऱ्हाड घेऊन कटिबद्ध झाल्यासारखे कामाला लागले. राजनारायण तर वाटेल ते बोलत सुटले. पक्षशिस्त हा प्रकारच जनता पक्षातून अस्तंगत पावायला लागला. विचार–स्वातंत्र्याचा, अतिरेक केला गेला आणि ज्याला जे वाटेल ते त्यानं बोलावं असा प्रकार सुरू झाला. यातूनच पुढे चरणसिंग–राजनारायण यांना मोरारजीनी इतर मंत्र्याच्या संमतीनं मंत्रिमंडळातून काढून टाकलं. त्यामुळे पक्षाला निर्माण झालेला धोका लक्षात घेऊन अटलबिहारी, जॉर्ज आदीनी मध्यस्थी करून चरणसिंगाना पुन्हा मंत्रिमंडळात घेतलं मोरारजीभाईंची इच्छा नसताना त्यांनी या सर्वांच्या दबावामुळे चरणसिंगांना मंत्रिमंडळात घेतलं; पण राजनारायणना मात्र त्यांनी परत घ्यायला ठाम नकार दिला आणि तो कायम ठेवला. तेव्हापासून 'मोरारजी हटाओ' हा राजनारायण याचा एक कलमी कार्यक्रमच झाला. " चरणसिंग मंत्रिमंडळात राहून आणि मी बाहेरून मोरारजीविरुद्ध लढा देणार आहोत " असंही त्यांनी जाहीरपणानं सागून टाकलं. त्यावेळी चरणसिंगांनी त्याचा इन्कार केला तरी भावी काळात तेच खरं ठरलं आणि त्याबरोबरच चरणसिंगांना परत मंत्रिमंडळात न घेण्याचा मोरारजीचा निर्धारही योग्यच होता, हे इतरांना कळून चुकलं; पण तेव्हा वेळ गेलेली होती. हळूहळू पक्षसंघटना अधिकाधिक गटात विभागून शिथिल व्हायला लागली होती. 'इंदिरा गांधीविरुद्ध कारवाई करायला असमर्थ ठरलेलं नामर्द सरकार' अशी चरणसिंगांनी ज्या मोरारजी सरकारची संभावना केली होती त्याच सरकारमध्ये उपपंतप्रधान–अर्थमंत्री म्हणून सामील होऊन चरणसिंग आपल्या गटाची बांधणी मजबूत करायला लागले होते. मोरारजीभाई काहीसे बेफिकीर बनले होते जनसघ त्याच्या पाठीशी उभा होता. 'चरणसिगाविरुद्ध' म्हणून बाबूजी मोरारजीच्या जवळ आले होते. जनसंघाशी त्याचीही जवळीक निर्माण झाली होती. जुनी नाती मोडली जात होती, नवे संबध जोडले जात होते.

जनता पक्षाचे सरचिटणीस असलेले मधू लिमये या सर्व परिस्थितीत सघटनापेक्षा विघटनालाच हातभार लावत होते राष्ट्रीय स्वयसेवक सघाच्या प्रश्नावर त्यानी वादंग उसळवलं होत. संघाचे जनता पक्षाशी काय सबंध असावेत, हा प्रश्न अनिर्णित रहात होता. ते त्याना मान्य नव्हतं. संघान जनता पक्षात विलीन व्हावं, असा त्यांचा आग्रह होता; परंतु संघाचा राजकारणाशी काहीही संबंध नाही. संघ जनता पक्षात विलीन होणार नाही, अशी संघ–नेत्याची भूमिका होती, आहे. संघ–जनसंघ वेगळे आहेत, हे अनेक नेत्याप्रमाणे मधू लिमये यांनाही मान्य नाही. म्हणून सघाच्या विलीनीकरणाचा आग्रह ते धरत होते. 'संघ जनता पक्षात विलीन होत नसेल तर जनता पक्षाच्या सदस्यानं संघाचा स्वयंसेवक असणं हे दुहेरी सदस्यत्व आहे, अशी दुहेरी निष्ठा असता कामा नये,' अशी भूमिका ते आग्रहीपणानं मांडत होते. राजनारायण, मणिराम बागडी





लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

आदीची त्याना साथ होती. चरणसिंग आतून त्याच्या बरोबरच होते. मधू लिमये याची संघाबद्दलची भूमिका काही अंशीच बरोबर होती. संघ-जनसंघामार्फत जनता पक्षावर वर्चस्व ठेवून संघटना-बळावर संपूर्ण पक्ष ताब्यात घेईल, अशी त्याची भीती होती. काही प्रमाणात हा धोका तेव्हा वाटत होता, हेही खरं आहे. 'संघ राजकारणाशी संबंधित नाही, असं म्हणतानाही असा प्रभाव पाडण्याचा संघाचा अप्रत्यक्ष प्रयत्न होता. अटलविहारीसारखे काही व्यापक विचारवादी जनसघ नेते वगळता इतराना हा प्रभाव मान्य होता. या दृष्टीनं पाहता मधू लिमये मांडत होते ती भूमिका योग्य होती. पण सर्वाधिक प्राधान्य देण्याइतका हा प्रश्न तातडीचा नव्हता. तसंच संघाला जनता पक्ष ताब्यात घेणं इतकं सहज शक्य आणि आवश्यक आहे का ? आणि संघ जनता पक्षात विलीन होण्यामुळे या स्थितीत फरक पडणार होता का ? जनता पक्षाची संघटना अधिक वाढवणं आणि मजबूत करणं हाच त्यावर उपाय नव्हता का ? या सर्व बाबींचा विचार त्यांनी करायला हवा होता.

भाववाढ, टंचाई, कायदा नि सुव्यवस्था अशासारखे अनेक महत्त्वाचे आणि तातडीचे प्रश्न जनता पक्षापुढे होते. पण मधू लिमयेंनी त्यात कधी लक्ष घातलं नाही. किंवा आग्रहीपणानं त्यासाठी लढा दिला नाही. उलट सरकार हे प्रश्न सोडवत नसल्याची टीका करण्यापलीकडे या बाबतीत त्यानी काही केलं नाही. त्यानी स्वत. संघाचा प्रश्न, सोडविण्याचा जणू ध्यासच घेतला होता. जातीय दगलीमागे संघाचा हात आहे, अशासारखे आरोप कोणताही पुरावा न देता, पक्षाच्या अध्यक्षानी, पतप्रधानांनी आणि चौकशी समित्यानी अलिगडसारख्या दंगलीत संघाचा हात नसल्याचं स्पष्टपणान सागितलेलं असतानाही, ते करीत राहिले. अशा आरोपानी, ठराव करून, बदी घालून किंवा संघाला बदनाम करून हा प्रश्न सुटणार नाही. सुसवाद आणि समन्वय त्यासाठी आवश्यक आहे. परिस्थितीच्या दडपणाखाली सघालाही बदलण भाग आहे आणि बाळासाहेब देवरसाच्या नेतृत्वाखालचा सघ अशा बदलाला सामोरा जातो आहे; हिंदूराष्ट्राची कल्पना नव्या सदर्भात खूपच व्यापक करणं त्याना पटल आहे. हिंदुराष्ट्राची विशिष्ट चौकटीतली कल्पना धरून चालणार नाही, हे ओळखून संघालाही व्यापक भूमिका घ्यावी लागते आहे. हे पाहता हा प्रश्न सावकाशपणे नि बऱ्याच काळान सुटण्यासारखा आहे, या बाजूकडे मधू लिमयेंनी लक्ष दिलं नाही.

## लिमयांचं कर्तृत्व

एस. एम. जोशी, मधु दंडवते, ना. ग. गोरे किंवा सुरेंद्र मोहन अशासारख्या पूर्वाश्रमीच्या समाजवादी नेत्याना संघाबद्दल प्रेम आहे, असं कुणीही म्हणणार नाही. संघाबद्दल त्याचेही आक्षेप आहेत. हा प्रश्न सुटला पाहिजे, असा त्यांचाही आग्रह होता. पण ठराव करून किंवा आदेश काढून तो सुटणार नाही. प्रदीर्घ काळ चालणारी ती प्रक्रिया आहे आणि तिचा प्रारभ मात्र आतापासून झाला पाहिजे, अशी या नेत्याची भूमिका होती. म्हणूनच त्यानी संघविरोध एका मर्यादेबाहेर ताणला नाही. मधू लिमये मात्र एका टोकाला जाऊन तो ताणत राहिले. अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक अशा दोन्ही समाजात जनता पक्षाबद्दल दुरावा निर्माण होण्यात लिमयांच्या या भूमिकेमुळे भर पडली. या मार्गाने जनता पक्षाची फार मोठी हानी त्यानी केली.

केवळ एवढयावरच ते थाबले नाहीत पक्षविघातक अशा अनेक गोष्टी त्यानी केल्या. राजनारायण विद्वान असले तरी त्याच्या अंगी विदुषकी जास्त आहे. पण मधू लिमयेंकडे तीव्र, कुशाग्र बुद्धिमत्ता आहे. दुर्दैवानं ती अतिरेकी टोक गाठणारी बुद्धिमत्ता आहे.

(जनता पक्ष सत्तेवर आल्यावर जनता पक्षेतर सरकारं असलेल्या राज्यातल्या विधानसभा विसर्जित करण, इंदिरा गांधीविरुद्धचं हक्कभग प्रकरण उपस्थित करण या मधू लिमयेंच्याच कल्पना होत्या.) अशा या बुद्धीवंतानं पक्षाची केलेली हानी राजनारायणाच्या कारवायापेक्षा मोठी आहे. म्हणूनच जनता पक्षाच्या विघटनात त्याचा वाटा मोठा ठरतो आणि त्यामुळेच त्याच्या हालचालींची काहीशी विस्तृत दखल घेणं आवश्यक आहे.

## पक्षपाती तत्त्वनिष्ठपणा

काती देसाईविरुद्ध श्री. मधू लिमये यानी उघडलेली आघाडी अगदी योग्य होती. पण त्यातही त्यानी काही तारतम्य ठेवायला हवं होतं. पक्षाचं व्यासपीठ उपलब्ध असताना स्वपक्षाला बदनाम करीत कातीप्रकरण गावोगाव उगाळण्याचं कारण नव्हतं, तरीही त्यानी ते केलं. हेच मधू लिमये बाबूजीच्या चिरंजीवाबद्दल, सुरेश रामबद्दल किंवा चरणसिंगाच्या पत्नी गायत्री देवी यांच्यावरच्या भ्रष्टाचाराच्याआरोपाबद्दल चौकशीच्या मागणीसाठी एवढ्या ठामपणानं कधी आवाज उठवताना दिसले नाहीत. भ्रष्टाचाराविरुद्ध त्याची तात्त्विक भूमिका एवढी प्रखर होती तर त्यानी या दोघाविरुद्धही आवाज उठवायला हवा होता. तसच मोरारजी सरकार गडगडून चरणसिंग सरकार सत्तेवर आल्यावर ते काती–प्रकरणी गप्प झाले. मग त्यांना चौकशीची गरज भासली नाही ? की राजनारायणानी अनधिकृतपणानं केलेल्या चौकशीच्या घोषणेन त्याचं समाधान झालं ?

कापुचियाला मान्यता देण्याच्या प्रश्नाबद्दलचा त्याचा आग्रहही असाच होता. रशियन लॉबीच्या इतके आहारी ते कशासाठी गेले होते, कुणास ठाऊक. पण कापुचियाला भारताने मान्यता द्यावी, यासाठी भाई डाग्यासारख्या रशियावादी कम्युनिस्ट नेत्यापेक्षा जनता पक्षाच्या या सरचिटणीसांनीच जास्त आग्रह धरला होता. पण विशेष म्हणजे अटलबिहारी परराष्ट्रमंत्री असताना सातत्यानं याबद्दल आवाज उठविणाऱ्या लिमयेंनी चरणसिंग सरकार सत्तेवर आल्यावर मात्र या प्रश्नासाठी आकाडतांडवच काय, पण कधी आग्रही प्रतिपादनही केलेलं दिसत नाही. श्यामनंद मिश्र परराष्ट्र मंत्री झाल्यावर त्याना हा प्रश्न आवश्यक आणि महत्त्वाचा वाटेनासा झाला का ?

मधू लिमयेंच्या भूमिकेबद्दलचे असे प्रश्न अनुत्तरित राहतात.

असे प्रश्न जनता पक्षाला पोखरत राहिले. जॉर्ज फर्नांडिस यांचा रेल्वे कर्मचाऱ्याना बोनस देण्याचा आग्रह आणि नंतर त्यानी मधू लिमयेंना दिलेली साथ, राज नारायणाच्या मोरारजीविरोधी कारवाया, पतप्रधानपदाच्या महत्त्वाकांक्षेनं चरणसिंगानी केलेल्या कारवाया, बिकट परिस्थितीत पक्षाला नेतृत्व देण्यात अध्यक्ष चंद्रशेखर

पृष्ठ २० वर

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# सामाजिक सेवा व क्रिकेट

व्याख्यानाचा विषय होता समाजसेवा आणि प्रमुख व्याख्याते होते, विजय मर्चंट. विद्यार्थी सहाय्यक समिती या संस्थेने ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी बांधलेल्या तिसऱ्या वसतिगृहाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने आरंभलेल्या तीन दिवसांच्या तीन व्याख्यान-सत्रांपैकी आज तिसरे व शेवटचे सत्र होते. विजय मर्चंट यांजबरोबर डॉ. सरदेसाई, डॉ. गुजर आणि मॅथ्यु लेदर्ले या तीन वक्त्यांची त्याच विषयाला धरून भाषणे होणार होती.

विद्यार्थी सहाय्यक समितीचे एक कार्यकर्ते डॉ. अच्युतराव आपटे यांनी, 'अंतर मम विकसित कर' हे स्वागतपर पद्य झाल्यावर चारही वक्त्यांची ओळख करून दिली. खरे म्हणजे अच्युतराव आपटे हे वक्त्यांची ओळख करून देत असता मी अच्युतराव आपटे व त्यांचे सहकारी यांची ओळख करून द्यावयास हवी. पण व्यत्यय येईल म्हणून ते काम नंतर करीन. वक्त्यांची ओळख करून देत आपटे म्हणाले, 'विजयजी मर्चंट हे निरहंकारी, क्रिकेटपटू, उद्योगपती, अपंगाचे आधार आहेत. विजयजींना पुणे फार आवडते. ते पुण्याला धडपडणारे गाव म्हणतात. डॉ. सरदेसाई म्हणजे ज्ञानयोग व राजयोग यांचा सुंदर संयोग आहे. डॉ. गुजर यांनी १९२६ साली सानेगुरुजी रुग्णालय सुरू केले. त्यांची सेवा सर्वांना माहीत आहे. मॅथ्यु लेदर्ले हे जेजुईट पंथीय आहेत. आता त्यांनी भारतीय नागरिकत्व स्वीकारले आहे. दुसऱ्या महायुद्धात त्यांनी भाग घेतला होता. मग ते भारतात आले व येथेच मिशनचे काम करण्यास राहिले. नगर व पुणे दोहीकडे त्यांचे सेवाकार्य चालू असते. मी त्यांना नेहमी म्हणतो की, आपण शंभर वर्षे धर्मशास्त्र बांधून ठेवू या. पण ते ऐकत नाहीत.'

वक्त्यांची आपटे यांनी विस्तृत करून दिलेली ओळख मी एका एका वाक्यात सांगितली आहे इतकेच.

□

नव्या वसतिगृहाच्या मधल्या चौकात हा समारंभ झाला. समोर छोटेसे व्यासपीठ सजवले होते. निमंत्रितांना खुर्च्या होत्या. दोनशे एक निमंत्रित असावेत. ते अगदी निवडक नागरिक वाटत असले तरी आपण नेहमी ऐकतो ते लेखक, कलावंत किंवा पुढारी त्यात नव्हते. असल्या कामात रस घेणारी ही मंडळी प्राध्यापक, इंजिनिअर, डॉक्टर, छोटे कारखानदार किंवा अधिकारी वर्ग यांच्यातील वाटत होती. सार्वजनिक कार्य करणाऱ्या संस्थांच्या मागे नेहमी उभ्या राहणाऱ्यांपैकी ते लोक होते.

प्रथम विजय मर्चंट बोलण्यास उभे राहिले. मराठीत क्रिकेट कॉमेंट्री करणारे प्रा. करमरकर यांच्याशी मी विजय मर्चंट-बद्दल बोलत असता ते म्हणाले होते— विजय मर्चंट नेमस्त आणि मनमोकळे आहेत. हे गुण कसे आले, तर माणूस जसा क्रिकेट खेळतो तसा आयुष्यात वागतो त्यांच्या मन-मोकळेपणाचे एक उदाहरण त्यांनी दिले. एकदा विजय मर्चंट निवडसमितीवर असता समितीने देवधरांना काढून टाकले व ट्रायल साठी बोलावले. देवधरांसारख्या मोठ्या खेळाडूला समितीने ट्रायलला बोलवावे हे विजय मर्चंटना आवडले नाही. त्यांनी देव-धरांची देवधर ट्रायलला आल्यावर त्यांची क्षमा मागितली. विजय मर्चंट कर्णधार असता मुंबईनं रणजी जिंकली. इंग्लंडमध्ये त्यांनी मुस्ताकच्या भागीदारीत शतक काढले. त्यांचा लेग कट् प्रसिद्ध होता.

अशा विजय मर्चंट यांचे व्याख्यान ऐकण्याचा योग आला याचे फार बरे वाटले. भाषण करताना त्यांचा आवाज व सूर त्यांच्या रविवारच्या रेडिओवरील भाषणासारखा असला तरी चेंडू मारण्याजोगे आल्यावर बॅटस्‌मन जसे फटके लगावतो तसे ते विनोदाचे फटके लगावत होते. मराठी बोलत असताना त्यांचे जे नैसर्गिक विनोद होत होते ते वेगळे. त्यांनी पहिलाच विनोद मारला तो असा. ते म्हणाले, माझे वय अडुसष्ट. मला एक चोवीस वर्षांची मुलगी आहे व एक वीस वर्षांचा मुलगा आहे. तुम्ही मनात वयांची सबस्ट्रॅक्शन (वजाबाकी) करू नका आणि इतकी वर्षे काय केले विचारू नका. इतकी वर्षे क्रिकेट खेळलो. (हशा) मी म्हटले की, घरी महाराष्ट्रीयन बायको आहे, तर विचारतात आणि बाहेर? (हशा) बायको माझ्याबरोबर येण्यास तयार नसते. ती म्हणते तुम्ही मराठी बोलू नका.'

एवढे भाषण मराठीत करून त्यांनी पुढचे सर्व भाषण इंग्रजीत केले. ते म्हणाले, 'लोक मला क्रिकेटर म्हणून बोलावतात. अजून मी आठवला जातो हा आनंद. आपल्या देशात स्मरण थोडे. लोक सर्वांना विसरतात

एकोणीसशे एकावन्न साली वयाच्या चाळिसाव्या वर्षी क्रिकेटमधून रिटायर झालो. मधे मला एकदा नर्गिस भेटली. आमची नर्गिस ती तुमची हेमामालिनी. नर्गिस मला लिफ्टशी रांगेत उभी दिसली मीही रांगेत तिच्यामागे उभा राहून तिला म्हटल, 'नर्गिस, मायडिअर, चाळीस वर्षांपूर्वी तू अशी लिफ्टशी आली असतीस तर पुरुषानी आणि स्त्रियानीही तुला वाट करून दिली ससती. असं क्यूमध्ये उभं राहावं लागलं नसतं लोकांचं स्मरण थोडं असतं हेच खरं.'

विजय मर्चंट पुढे म्हणाले, 'गेल्या आठ वर्षांत क्रिकेट कॉमेंटेटर म्हणून रेडिओवर मी साडेचारशे प्रोग्रॅम्स केले. आता माझ्या आयुष्याची दुसरी इनिंग सुरू आहे. (समाजसेवा.) आपल्या खेळाडूंच्या पद्धतीप्रमाणे दुसरी इनिंग चांगली जाते. दुसऱ्या इनिंगने माझे खरोखरच समाधान केले आहे.'

आणखी एक क्रिकेटची उपमा देऊन आपल्या भाषणाच्या विषयावर–सामाजिक सेवेवर–येत ते म्हणाले, 'क्रिकेटमध्ये असे आहे की, एका बाजूच्या सबळ बॅटस्मनने दुसऱ्या बाजूच्या दुर्बल बॅटस्मनची काळजी घ्यावी. तसेच समाजात जो सबल घटक आहे त्यांनी दुर्बल घटकाची काळजी घ्यावी. जर आपण केवळ खत टाकीत राहिलो तर किडे मुग्यांहून वेगळे काय केले? सामाजिक सेवा हा माझ्या आयुष्याचा आनंद आहे.'

क्रिकेटमधील उपमा पेरीत त्याचे व्याख्यान चालले होते. त्यावरून हा माणूस क्रिकेटमध्ये किती बुडलाय हे कळत होते व गम्मतही वाटत होती लोकापुढे येऊन बोलण्याच्या भीतीबद्दल ते म्हणाले, 'मी बंपर खेळलो आहे, मी पब्लिकला तोंड देण्यास का भ्यावे?' आपल्या अपंगामधील कार्याबद्दल त्यांनी अनुभव सांगितले. दोन आंधळ्याचे लावलेले लग्न. अडचणीतल्या स्त्रियांना दिलेला आधार आपल्या हिंदुस्तान मिलसची डायरेक्टरशीप अव्हेरून आपण या अपंगांच्या कार्यासाठी स्वतःला मोकळे ठेवल्याचे त्यांनी सांगितले मृत्यूनंतर आपल्या नेत्राचे दान द्यावे असे आपण लिहून ठेवले आहे, असेही ते म्हणाले. सोशल वर्कमध्ये अनेकदा तुम्ही अडचणीत येता. पण तुमचे हात व हृदय स्वच्छ असेल तर काही त्रास होत नाही, असा आपला विश्वास त्यानी सांगितला. अशा तऱ्हेची बोध वाक्ये व्याख्यानात पेरण्याची त्याना सवय आहे. त्यांचे घराणे गेली १०५ वर्षे उद्योगपतीत मोडते, 'धन्य मी कृतार्थ मी' असा जो सूर त्यांच्या व्याख्यानात होता तो ठीकच होता. शेवटी पुन्हा क्रिकेटवर येत त्यानी व्याख्यान संपवले. ते म्हणाले, 'आयुष्याच्या मोठ्या मैदानावरही आमचा बाप क्रिकेट खेळला असे माझ्या मुलांनी म्हणावे एवढीच माझी इच्छा आहे.

◘

दि. २५।२६।२७ डिसेंबर या तीन दिवसाच्या चर्चासत्रात पहिल्या दिवशी वि. स. समितीच्या वसतीगृहाच्या वास्तूचे नानी पालखीवाला यांनी उद्घाटन केले. या वास्तूत एकशे बासष्ट विद्यार्थ्यांची राहण्याची व दोनशे विद्यार्थ्यांची जेवणाची सोय आहे. त्याशिवाय विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सोई, कचेऱ्या, वगैरे गोष्टी अतर्मुख आहेत. यापूर्वी समितीच्या दोन इमारती झालेल्या आहेतच. एकीत एकशेवीस मुलाची दुसरीत साठ मुलींची राहण्याची सोय आहे ही सर्व मुले व मुली महाविद्यालयीन विद्यार्थी असून ग्रामीण भागातील आहेत.

विद्यार्थी सहाय्यक समितीची मूळ कल्पनाच ती आहे. लहान गावातून शालेय शिक्षणाची सोय झाली आहे. पण त्यातील ज्या हुशार, गरीब विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन विविध अभ्यासक्रमासाठी पुण्यासारख्या मोठ्या शहरात यावे लागते. त्याच्यापुढे शहरात रहावे कुठे? खावे कुठे? पुस्तके कशी विकत घ्यावीत? आपल्याला मार्गदर्शन कोण करील वगैरे प्रश्न उभे राहतात. शहरात शिकण्यासाठी वगैरे लागणारा पैसा त्याच्यापाशी नसतो आणि त्यामुळे हुषारी असूनही त्याना शहरात येऊन शिक्षण घेता येत नाही किंवा शिक्षण अर्धवट सोडण्याचा दु:खद प्रसंग येतो. अशा ग्रामीण विद्यार्थ्यांचा हा प्रश्न सोडवण्यास ही संस्था १९५६ साली सुरू झाली. कै. हरिभाऊ फाटक यांनी बाहेर गावच्या पाचसहा विद्यार्थ्यांची जेवण राहण्याची सोय करून आरंभ केला. त्यासाठी त्यानी मित्राकडे या विद्यार्थ्यांचे वार लावले. हळूहळू हरिभाऊ फाटकाच्या भोवती कार्यकर्ती मंडळी जमा होऊ लागली. प्रथम डॉ. अच्युतराव आपटे, श्रीमती सुमित्रा केरकर, श्रीमती शांता मालेगावकर नंतर २।३ वर्षांनी श्री. यादवराव कुलकर्णी, निर्मला पुरंदरे वगैरेसारखे अनेक कार्यकर्ते मिळाले. पुण्यातील महाविद्यालयांनी आपलेच कार्य ही संस्था करीत आहे हे ओळखून तिला सहकार्य देण्यास सुरवात केली. आज चोवीस वर्षांनी संस्थेचे कार्य चारपाचशे विद्यार्थ्यांची जेवणाराहण्याची सोय करण्याइतके वाढले आहे. ज्याचे पुण्यात घर नाही अशा विद्यार्थ्यांना दीडशे रुपये सहज खर्च येतो. विद्यार्थि साहाय्यक समिती हा खर्च निम्म्यावर आणते. म्हणजे आपल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पंचेचाळीस रुपयात जेवण देते व रहाण्याचे भाडे एका टर्मचे ८५ रुपये घेते. शिवाय या विद्यार्थ्यांना, मोफत व वैद्यकीय सहाय्य मिळते. वाचनालय व पुस्तके यांची सोय करते, जरूर त्यांना पार्टटाईम नोकऱ्या देते आणि व्याख्याने वगैरे करवून मार्गदर्शन करते. येथे राहणाऱ्या मुलामुलीवर चांगल्या तऱ्हेचे सस्कार व्हावेत, विचाराना चालना मिळावी असे यत्न केले जातात. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतून येथे विद्यार्थी येतात. निरनिराळ्या जिल्ह्यातून आलेल्या पाच हजार विद्यार्थ्यांनी व पाचशे विद्यार्थिनीनी गेल्या २२ वर्षांत संस्थेच्या अल्प दरातील भोजन व्यवस्थेचा लाभ घेतला आहे.

◘

विजय मर्चंट यांनी पुण्याला धडपडणारे गाव म्हटले ते अक्षरश: खरे आहे. घरी खायला नसते. पण काही माणसं मोठ-मोठ्याला संस्था उभ्या करताना दिसतात. पुण्याचे व मराठी माणसाचे हे वैशिष्ट बाहेरच्याना विशेष जाणवते माझ्या ओळखीचा एक लक्षाधीश सिंधी नेहमी आश्चर्याने म्हणतो. 'आमच्या सिंधी लोकाजवळ लाखो रुपये असून आमच्या संस्था उभ्या रहात नाहीत. आम्ही फार भाडखोर लोक आहोत. पण तुम्ही मराठी लोकांजवळ जेमतेम खाण्यापुरता पैसा असून तुम्ही मोठमोठ्या संस्था उभ्या करिता, त्यांच्या इमारती उभ्या करता आणि कार्यही करता.' या सिंध्याचे म्हणणे अगदी खरे आहे. तुम्ही सहज डोळे मिटून महाराष्ट्रातील अशा संस्था आठवू लागा. त्या शेकड्यानी भरतील. पैसे जमवून उभ्या केलेल्या या संस्था पै पै देणाऱ्यांना कधी उभ्या राहिल्या हे कळले नसेल. मला आठवतंय की पन्नाससाठ वर्षापूर्वी विवाह किंवा मौजीबंधन अशा प्रसंगी जेवणावळीत प्रत्येकापुढे एकेक पैसा दक्षिणा ठेवण्याची पद्धत होती. ही दक्षिणा पैसाफंड कारखान्यासाठी मदत म्हणून गोळा करण्यास आम्ही धावत असू. गावोगावाहून असा किती पैसा पैसाफंड कारखान्यास मिळाला ते पाहिले पाहिजे. आपण मराठी माणसाला त्याला व्यापार धंदा जमत नाही अशी पुष्कळ नावे ठेवतो. पण तोच मोठ्या संस्था उभ्या करून वर्षानूवर्षे चालवितो हे विसरता येणार नाही.

दि. २७।१२ च्या तिसऱ्या सत्रांतील विजय मर्चंट यांच्या व्याख्यानानतर डॉ. सरदेसाई व मॅथ्यु लेदरले बोलले. या दोघानंतर सानेगुरुजी रुग्णालयाचे डॉ. गुजर याचे भाषण झाले. ते म्हणाले, 'आमचे रुग्णालय उभे करायला प्रेरणा सानेगुरुजी याची होती. आमच्याजवळ पैसा नव्हता. पण मिशनरी मंडळी जे करितात ते आम्हाला का करता येऊ नये? असा विचार मनात आला. रुग्णालयाची सुरुवात जुन्या बाजारातून वस्तू आणून केली जिद्द फार होती. पण अशा कार्याची हेटाळणी होतेच. अशी कामे करायला लागल्यानंतर नातेवाईक जवळजवळ बहिष्कार टाकतात. पण असे होते तरी मी हडपसरला जाऊन रुग्णालयात कामाला लागलो की कामात हरवून जावयाचो. असली कामे निरपेक्ष बुद्धीने करावी लागतात.

डॉ. गुजर पुढे म्हणाले, 'पहिली दहा वर्षे रुग्णालय स्थिर करण्यात घालविली. तेथे आमचा कस लागला. कारण आरंभी सारखे टायफॉइडचे रोगी येऊ लागले. एकदा बरा झालेला माणूस पुन्हा पुन्हा येई. आम्ही औषधे देतच होतो. आमची सर्व शक्ती व पैसा त्यात जाऊ लागला. आम्हाला कळेना काय करावे. मग एक कल्पना आली. पुण्याच्या भोवतालच्या या गावातले पिण्याचे पाणी दूषित होते. पायऱ्याच्या विहिरी होत्या त्यामुळे रोग पसरत होता व रोगी पुन्हा पुन्हा येत होता. तेव्हा रोग्यांना उपचार करीत असताच आम्ही विहिरी दुरुस्त करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. पडणारे पावसाचे पाणी साठविण्यास बंधाऱ्यांचे काम हाती घेतले. लोक हसू लागले. पेशंटना औषधे देण्याचे सोडून आम्ही नसते उद्योग काय करीत आहोत? पण आम्ही योग्य गोष्ट करीत होतो, आजारी पडण्याचे कारणच नाहीसे करीत होतो.

पाणी खराब होणे थावताच रोग्यांची संख्या घटू लागली. परिसरातून टायफाईड पळाला. लोकांच्या ते लक्षात आले व ते आपण होऊन आणखी बंधारे बांधू लागले. विहिरी नीट केल्या. विहिरीना पाणी येऊ लागले. नव्वद टक्के रोग गेले. आमचा खर्च कमी झाला व लोकांचे आरोग्य सुधारले. ज्या खेड्यांतून पूर्वी हताश व उदास वातावरण होते तेथे प्रफुल्ल वातावरण झाले. लोकाचे नैराश्य गेले. विद्यार्थ्यांनी या वेळी खेड्यातून कामे केली. तेव्हा गावातले लोकही कामे करू लागले. सरकारने केले पाहिजे असे म्हणून लोक स्वस्थ बसत. ते थाबले. शेतीचे उत्पन्न वाढले. जीवनमान सुधारले. उपचार करीत बसण्यापेक्षा आरोग्य चागले राहील अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे हे आमचे तत्त्व होते. उपचार करीत राहण्यास अंतच नसतो. खेड्यातील तरुण पोरं मोकळी भटकत असत. आता ती शेतावर काम करू लागली. गावातील चोऱ्या कमी झाल्या.

डॉ. गुजराचे व्याख्यान अत्यत कळकळीचे व उद्‌बोधक झाले. समाजसेवासुद्धा बुद्धीचा वापर करून केल्यासच समाजास हितकारक होते हे पुन्हा एकदा कळले. डॉ. गुजराचे व्याख्यानानंतर आभाराचे भाषण होऊन, वंदेमातरम् झाल्यावर विद्यार्थी सहाय्यक समितीच्या तिसऱ्या वसतिगृहाच्या वास्तूच्या उद्घाटन समारंभातील तिसरे व शेवटचे व्याख्यानसत्र संपले.

□

कै. हरिभाऊ फाटक यानी ज्ञान्याप्रमाणे आरंभिलेले हे कार्य विद्यार्थी सहाय्यक समितीच्या माजी व आजी कार्यकर्त्यांनी विस्तारून त्याचा नाद केला. त्यांच्या मनात हे कार्य एक हजार विद्यार्थ्यांची सोय होईल एवढे वाढवावे असे आहे. तीही मनीषा पुरी होईल.

मला एकच प्रश्न आहे. बावीस तेवीस वर्षे कार्य चाललेल्या या संस्थातून जे विद्यार्थी शिकून बाहेर पडले त्याच्यातून वि. स. समितीचे कार्य करावयास कार्यकर्ते निर्माण होत आहेत का? येथून शिकून गेलेला विद्यार्थी, नोकरीत वगैरे स्थिर झाल्यावर संस्थेकडे येऊन म्हणतो का की 'सर! मला तुमच्या तुमच्या कार्यात घ्या.' असा एक विद्यार्थी जरी अधून मधून पुढे आला तरी पुरे. पण आला नसेल तर मात्र विद्यार्थ्यांना ती गोष्ट नामुष्कीची आहेच पण सस्थेच्या दृष्टीनेसुद्धा चिंता करण्यासारखी आहे. तसे नसेल अशी मी आशा करतो. □

## बगाड (५)

# शाबास बॅरिस्टर !

बध्या

जनता पक्षाचे 'हे असे' का झाले ?

बाईंच्या लाटेपुढे जनता पक्षाचे तारू का भगले ?

हजारोंच्या संख्येने सभाना गोळा होणाऱ्या लोकानी मते का दिली नाहीत ?

लाखानी खपणाऱ्या वर्तमानपत्रानी जनता पक्षाला उचलून धरले असता त्या वर्तमानपत्राचे वाचक मात्र इंदिरा काँग्रेसच्या हातात हात का मिळवते झाले ?

देशभराच्या गोष्टी सोडा, पण बुद्धिमंताचे आगर म्हणवणाऱ्या पुण्यानेसुद्धा जनता पक्षाला झिडकारावे ना ! चतु:शृंगीच्या माळावरचे सारे विचारवंत आपला विद्यानिधी पणाला लावून सामान्य जनतेच्या मतपरिवर्तनार्थ राबत असताना त्याच्याकडे उपहासासाठीदेखील न वळता मतदारानी बेमालूमपणे काँग्रेस (आय्) ला बेसुमार मताचा खंडणी द्यावी !

अण्णासाहेब, कितीही पडक्या चेहऱ्याने, व्याकुळलेल्या नजरेने आणि जखमी आवाजाने तुम्हा ही गाऱ्हाणी आमच्यापुढ गाइलीत तरी आम्हो आज तुमच्याकडे साफ दुर्लक्ष करणार आहात, जसे आम प्रजेने तुमच्या पक्षाकडे केले तसे ! आजचा दिवस मेलेल्याला मूठमाती देण्याचा नाही तर जेत्याच्या मुकुटग्रहणाचा आहे. आजचा दिवस उगवत्या सूर्याला अर्घ्य देण्याचा आहे, कालच्या उदास सध्याकाळीची गहिवरभरी आठवण करण्याचा नाही. आज आम्हो नानासाहेब गोरे पडले याची चिंता करत नाही. तर पुण्यातील नवे लोकप्रतिनिधी, पुण्याचे आदिखासदार काकासाहब गाडगोळ याचे सुपुत्र आणि भारतभाग्यविधात्या इंदिरा गाधी याचे 'स्मरणसतोष' बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ याचे अभिनंदन करतो.

नो, नो, नो अण्णासाहेब ! हरकतीसाठी हात उचलू नका, तो तुमच्या शत्रुपक्षाच्या चिन्हाचा प्रचार ठरेल. अरेरे, नाहीच ऐकत तुम्ही. बरं, बोला मग, करता काय.

ही निवडणूक निवडणूक नव्हतीच. ते होते एक सार्वमत निदान आता तरी असे म्हणणे भाग आहे की, इदिराबाईंनी राज्य करावे की नाही? या प्रश्नावर घेतलेले सार्वमत असे या निवडणुकीचे स्वरूप होते. सार्वमताची तरतूद आपल्या घटनेत नाही म्हणून निवडणूक झाली इतकेच. तेव्हा फार तर त्या भारतभाग्यविधात्रीचे अभिनंदन केले तर ते योग्य ठरेल. यात स्मरणसंतोष विठ्ठलरावजीचे अभिनदन कशाला ? ते खरोखर पुण्यातील जनतेचे प्रतिनिधी आहेत काय ? अहो, ज्या कॅंटोनमेंट विभागातून त्याना भरघोस मते मिळाली तेथेदेखील याच्या सभांना पन्नासावर माणसे कधी जमली नाहीत. जेथे मतदार आणि उमेदवार याच्यात काही दळणवळण नाही, तेथे तो उमेदवार भले निवडून आला तरी लोकप्रतिनिधी कसा ठरतो ? याच्या उलट आमचे नानासाहेब पहा...

बस्स. तुमच्या बोलण्याचा मायना आमचे ध्यानात आला: तुमच्या या कुत्सित आक्षेपाला सडेतोड उत्तर आमच्याकडे आहे. पण तूर्त आजचे कर्तव्य पार पाडले पाहिजे; आणि ते म्हणजे बॅरिस्टर विठ्ठलरावजी याना शाबासकी देण्याचे !

### विठ्ठलरावजींचे अभिनंदन

विठ्ठलरावजी, या अण्णासाहेबासारख्याचे नादाला लागून आम्ही आजवर आपली बरेचदा चेष्टा–टवाळी केली. पुढ ती करणार नाहीच असे नाही. आपले पुण्यश्लोक पिताजी म्हणत असत को, पुण्यातोल प्रत्येक मनुष्य हा राजकारणी असतो, तो पुण्यातील कॉलेजात शिकला का मुत्सद्दी होता आणि पुण्यातल्या तीन पेठात त्याचा जन्म झाला असेल तर साडेतीन शहाण्यातच त्याचा समावेश केला पाहिजे. अण्णासाहेब आणि, आम्ही असे दोघेही या सर्व गुणानी मंडित आहोत. त्यामुळे टिंगलखोरीचा आमचा हक्क जन्मसिद्ध आहे. कोणतीही घटनादुरुस्ती त्याला बाधा आणू शकत नाही.

७७ च्या निवडणुकोपूर्वी मत्री असताना तुम्ही गादीचे वारस संजयराव याना आ त्य विमानातून फिरवत होतात, म्हणून आम्ही तुम्हाला हसलो. त्या निवडणुकीत उमेदवार झाल्यावर इग्लडमधले संदर्भहीन आणि गैरलागू दाखले देऊन आपण आणीबाणीचे समर्थन केलेत त्याचा आम्ही उपहास केला. निवडणूक हरल्यानंतर तुम्ही राज्यसभेतल्या खुर्चीवरची बैठक हलवली नाहीत. उलट राजनारायण याचे उदाहरण देऊन राजिनामा देण्याला नकार दिलात त्याची टिंगल आम्ही केलीच.

मध्यतरी आपल्याला उपरती झाली. आपले मित्र आणि केसरीचे तळागाळापर्यंत पोचलेले– नाही, नाही. काहीतरी चुकतंय्– तळागाळाला केसरी पोचविणारे– छ्या भलतेच. अण्णासाहेब, तो केसरीचा शताब्दी वर्षाचा अग्रलेख घ्याहो– हा, आता जमले– तळागाळाच्या माणसापर्यंत केसरी पोचविणारे सपादक जयंतराव टिळक याच्या सहकार्याने आपण माफी-फोरम काढलात. आणीबाणीतल्या अतिरेकाबद्दल काँग्रेसने माफी मागावी अशी या फोरमची मागणी होती. आपला हा गहिवर आणि पश्चात्ताप आम्हाला लाडिकपणाचा वाटला. त्याची योग्य ती दखल घेतलीच.

असो. आम्ही हे जाणतो की, या जुन्या आठवणी कितीही रम्य असल्या तरी आता त्याचा उपयोग नाही. तुमच्यासारखे राजकारणी सतत वर्तमानकालात, भविष्याचा वेध घेत, जगत असतात. गतकाळाचे गाठोडे कुत्सित पत्रकाराच्या खुटीला अडकवून. परंतु, तरीही या आठवणी काढल्या त्या अशासाठी को, आम्ही आपली कधीही अपेक्षा केली नाही हे तुमच्या ध्यानात यावे. आम्हाला हे माहीत आहे की, टीका-टवाळी-भाडण ही सर्व आपल्याला चालतात. पण उपेक्षा सहन होत नाही. आम्ही आपलो कधीही उपेक्षा केली नाही.

तुमची कधी उपेक्षा न करण्याच्या या ब्रीदाला जागूनच आम्ही आज तुमचे अभिनंदन करतो. इंदिरा–काँग्रेसतर्फे आज साडेतीनशे खासदार निवडून आले आहेत. आपण स्वकर्तृत्वापेक्षा बाईंच्या लोकप्रियतेच्या बळावर निवडून आलो हे सर्वचजण मान्य करतात. अशा स्थितीत कोण्या खासदाराचे वैयक्तिक अभिनंदन किंवा सत्कार करण्यात

हुशील नाही. परंतु खासदारांच्या झुंडीतली ही उपेक्षा तुम्हाला आवडणार नाही.

### विठ्ठलराव उपेक्षणीय नाहीत

विठ्ठलराव उपेक्षणीय नाहीत. पुण्याच्या प्रतिनिधी, मग तो इंदिराबाईंच्या झुंडीत सामील झालेला का असेना, उपेक्षणीय राहूच शकत नाही. सद्सद्विवेकाला न पटणारी गोष्ट तो पक्षाच्या तिस्मारखान पुढाऱ्याला किंवा त्याच्या बगलबच्च्याला आवडणार नाही म्हणून मान्य करील, हे घडणार नाही. काकासाहेब गाडगीळांचीच कारकीर्द आठवा. महाद्विभाषिकाची तरतूद असलेले राज्य-पुनर्रचना विधेयक लोकसभेपुढे होते. द्विभाषिकाचा मोठा उदो उदो केवळ काँग्रेस-पक्षातच नव्हे तर विरोधी पक्षातही होत होता. पण काकासाहेबांना वाटले की, या विधेयकाला मान्यता म्हणजे भाषावार राज्य-रचनेच्या तत्त्वाशी तडजोड करण्यासारखे होईल. त्यानी एकटयाने व्हिप डावलून विरोधी मत दिले. नानासाहेब गोरेही तसेच. चीनचे अक्साई चीनवरील आक्रमण झाकून ठेवण्याचे आटोकाट प्रयत्न नेहरूंनी केले. पण नानासाहेबांनी कोणतीही भीड न बाळगता सारे प्रकरण चव्हाटयावर आणले. शंकरराव मोऱ्याचा फटकळपणा, स्वतंत्रवृत्ती आणि निस्पृहता प्रसिद्धच आहे. मोहन धारियांनी तर मंत्रिपदावरसुद्धा तत्त्वासाठी उदक सोडले. विक्रमादिमत्याच्या सिंहसनावर गवळयाचा पोर नसला तरी बृहस्पतीची बुद्धी दाखवू लागे. विठ्ठलराव तर बॅरिस्टर आहेत !

याचा अर्थ असा नाही की, विठ्ठलरावाच्या अभिनंदनाचे निमित्तकरून आम्ही विठ्ठल-रावाविषयी काही अपेक्षा व्यक्त करीत आहोत. अखेर बाणेदारपणा दाखविण्याची वेळ येतेच असे नाही. आली आहे की नाही या विषयीही मतभेद होऊ शकतात. आम्ही विठ्ठलरावाचे अभिनंदन ते खासदार झाले म्हणून करतो असे नाही. त्याची नवप्राप्त खासदारकी हे अभिनंदनाचे, शाबासकीचे केवळ एक निमित्त आहे. आम्ही विठ्ठल-रावांची पाठ थोपटतो ती तीन कारणानी.

### पाठ थोपटलीच पाहिजे !

पहिले म्हणजे जनता पक्षाच्या राज-वटीच्या ऐन प्रभाती देखील, जनता पक्षाचे विरोधक आपल्या पराभवाच्या जखमा कुर-वाळीत आणि आणीबाणीतील कर्तव्य-च्युतीच्या लाजेने दिवाभीताप्रमाणे गुडुप बसले असताना, जनता पक्ष हा लोकांचा भ्रमनिरास करील हे सांगण्याचे धैर्य त्यानी दाखविले. त्यांचे जनता पक्षाविषयीचे तेव्हाचे मत आम्हाला आजही मान्य नाही. पण 'वचन भंगाचे शंभर दिवस' या विषयावर गोखले हॉलमध्ये त्यांनी छाती ठोकपणे व्याख्यान दिले आणि एखाद्या ममीप्रमाणे लाकूड होऊन पडलेल्या काँग्रेस पक्षाला हाल-चाल करण्याइतकी ऊब दिली हे मान्य केले पाहिजे.

दुसरे म्हणजे इंदिरा गांधी ही व्यक्ती भविष्याची लाट आणणारी आहे, हे त्यानी फार आधी ओळखले आणि त्या विश्वासाला ते ठामपणे चिकटून राहिले. '९२ वर्षांची काँग्रेस धुळीला मिळवणारा २९ वर्षाचा पोर' संजय बाईंच्या शेजारीच उभा असताना,आपली सर्व पूर्वीची मते हे पूर्वग्रह होते अशी स्वत.ची समजूत घालीत अनेक अपमान गिळून ते काँग्रेस (आय्) मध्ये राहिले. त्याना महाराष्ट्र काँग्रेस (आय्)चे अध्यक्ष करण्यात आले नाही तरी त्यांनी पर्वा केली नाही. पुण्यात नानासाहेब गोऱ्यासारख्या मात-बराशी सामना ही सोपी गोष्ट नव्हती. जिंकण्याची आशा जवळ जवळ नव्हतीच. त्याचा इमानी 'केसरी' देखील अगदी शेवटच्या दिवसापर्यंत लढत अटीतटीची होईल अशी अपेक्षा भीतभीत करीत होता. पण विठ्ठलरावांनी आपल्या प्रचार कार्यात ढिलाई येऊ दिली नाही. इंदिरा बाईंवर अढळ विश्वास ठेवून ते काम करत राहिले.

तिसरी आणि आमच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की, त्यानी तुम्हा-आम्हा सदाशिव पेठी पांढरपेश्याविषयी निरपेक्ष आस्था सतत दाखविली. थाबा, अरे असा कालवा करू नका. सगळं विगतवार सांगतो. आम जनतेला मतदानाचा हक्क मिळाल्या-नंतर राजकीय दृष्टीने जागरूक असलेला आणि राजकारणाची परंपरा असलेला शहरी मध्यमवर्गीय समाज उपेक्षणीय अल्प संख्या-काचा असल्याने पक्षाच्या गणितात नगण्य ठरला. महाराष्ट्रात सतत सत्तारूढ असलेल्या काँग्रेस पक्षाची तर या वर्गापासून पूर्ण फारकत झाली. याचा खेद खुद्द काकासाहेबानी आत्मचरित्रात व्यक्त केला आहे तो असा : काँग्रेस पण शेतकऱ्यापर्यंत आणि कामगारा-पर्यंत पोचायला हवाच होता. पण त्यासाठी काँग्रेस पक्षच स्वत: शेतकरी कामगार पक्ष व्हावा हे चांगले झाले नाही.

ही गोष्ट आपण पांढरपेशांच्या दृष्टीने जशी अडचणीची झाली, तरी ती काँग्रेसच्या दृष्टीनेही खंत वाटावी अशीच होती. याचे कारण असे की, बहुमताच्या सहाय्याने सत्ता किंवा सामर्थ्य मिळते पण अधिकार मिळतोच असे नाही. सत्ताधारी पक्षाच्या निर्णयामागे सत्ता उभी असतेच. त्यामुळे जनतेला ते निर्णय मानावे लागतातच. मात्र सत्ताधारी पक्षाचे निर्णय जनता स्वीकारतेच असे नव्हे. हे निर्णय लहरी, मतलबी किंवा एकांगी आहेत असे प्रजेला वाटण्याचा संभव असतो. यासाठी हे निर्णय युक्तिसंगत आहेत हे पट-वून द्यावे लागते. निदान तसा प्रयत्न करावा लागतो. थोडक्यात म्हणजे सत्ताधाऱ्याच्या निर्णय किंवा हुकूम सामर्थ्यशाली असला तरी अधिकार-मुक्त असतोच असे नाही. हा अधिकार त्या हुकुमाचे ठिकाणी तेव्हाच येतो की जेव्हा त्या हुकुमाचे मुक्तिसंगत विवेचन सत्ताधारी पक्षाकडून होते.

दुर्दैवाने आज परिस्थिती अशी आहे की, आम-जनता या मुक्तिसंगत विवेचनाला प्रतिसाद देऊ शकत नाही. समजातील शहरी पांढरपेशा वर्गच केला अशा मुक्तिसंगत विवेचनात रस घेतो. पांढरपेशा वर्ग अल्प-संख्य असला, निवडणुकीच्या दृष्टीने नगण्य असला तरी त्याचे महत्त्व या कारणाने आहे. हा वर्ग काँग्रेसला पराङ्मुख झाल्याने त्या पक्षाला मुक्तिसंगत विवेचनाची बूज राहिली नाही. परिणाम असा झाला की, पक्षाचे निर्णय एकांगी, लहरी किंवा स्वार्थी आहेत असा समज फैलावत चालला. आणीबाणीत तर याचा अतिरेक झाला आणि पक्षाला असलेले चर्चेचे वावडे अशा थराला पोचले ते, वृत्तपत्रांवर निर्बंध लादून सर्वच विचार विनिमय बंद पाडण्यात आला.

बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ यांना आम्ही मानतो ते अशासाठी की, मुक्तिसंगत विवे-चनाचे अगत्य त्यानी सतत राखले याचा अर्थ असा नाही की, इंदिरा गांधीच्या करारी आणि आक्रस्ताळी राजवटीचे त्यांनी केलेले समर्थन आम्हाला पटले. परंतु, तसे समर्थन करण्याची जरूर फक्त विठ्ठलरावानाच भासली ही लक्षणीय गोष्ट होती. विठ्ठलरावानी तुम्हा-आम्हा सदाशिवपेठी पांढरपेशाविषयी निरपेक्ष आस्था सतत दाखविली असे म्हण-ताना आम्हाला अभिप्रेत अर्थ हा होता. ही आस्था निरपेक्ष होती, कारण त्याचे विवेचन आम्हाला पटणार नाही हे त्यांना पूर्ण माहीत होते.

तेव्हा जनता पक्ष आणि विशेषत: नाना-साहेब गोरे निवडणूक हरल्याचे तीव्र दु:ख बाजूला ठेवून आम्ही बॅरिस्टर साहेबाचे अभिनंदन करतो ते केवळ तोंड देखला औपचारिकपणा म्हणून; किंवा आमच्या-कडून काही अपेक्षा आहेत म्हणूनही नव्हे; त्यानी तुमच्या-आमच्यासाठी जो निरपेक्ष आस्था सतत दाखविली त्याची पावती द्यावी यासाठी. ❑

कथा

# लांडगे

कुसुम कर्णिक

सांज व्हायला चालली होती. शेतात हरभऱ्यात खुरपणी चालली होती. खुरप्याबरोबर बायांची तोंडंबी चालली होती. बायडी, विमली, मगी, बजाबाय, रत्नी साऱ्या एकमेकीची चेष्टा करत होत्या, गोष्टी सागत होत्या. गावात एकदा लांडगं शिरलं होतं त्याची हकीकत बजाबाई सांगत होती. बायडीच्या अंगावर काटा उभा राहिला होता. 'लांडगं म्हंजी लई दुष्ट जात. बकरी कोकरी येऊन कवा धरत्यात कळत न्हाई. बायाच्या मागं लागती. बायानला आवरत न्हाईत.'

ऐकताना बायडी सारखी शहारत होती. भीती तिच्या काळजात दाटत होती. बापाचं तोंड तिच्या डोळ्यासमोर आलं लबाड दिसायचा. दारू फार प्यायचा. एरवी दातावर मारायला पैसा नसायचा. पण दारू रगड प्यायचा. घरची सारी शेती, मळा त्याने खडाने लावली होती. दारू पिऊन लई माजायचा. आणि एरवी पाढरेधोप कपडे घालून पुढारी म्हणून मिरवायचा. कामाला तर हात कधीच लागायचा नाही बायडी आणि आई मोलमजुरी करून चार पैसे कमवायच्या आणि घर चालवायच्या आणि वर दारू पिऊन याचा मार खावा लागायचा. दारू प्यायल्यावर मांयदळघा शिव्या द्यायचा. च्यामायलाशिवाय बोलायचा न्हाई मग तो. कधी कधी बायडी कावून जायची मग त्याचा आईला मारणारा हात धरून त्याला ओढत कोपऱ्यात नेऊन गप्प करायची.

पण गेले काही दिवस बापाचे वागणे बदलले होते. दारू बंद झाली होती. चेहरा आणखीच लबाड वाटत होता. गावातले बापू, नाना, आणखी कोणीकोणी बसून दबल्या आवाजात बोलताना तिने दोन तिनदा बघितले होते. तिला बघितल्यावर ते चपापून गप्प झाले होते. लांडग्याच्या डोळ्यागत बघत राहिले होते. बायडी शहारली होती त्याच्याकडे बघून. घरात बापाचं तोंड शिव्या ओकत नव्हतं. मधूनच काळजीनं बोलायचा. गोड वागत होता. बायडा आणि आई एकमेकीकडे बघून गप्प होत होत्या. काहीतरी चुकत होतं. लक्षणं काही बरी नव्हती. पण दोघी बोलणार तरी काय?

'बायडे, जरा काम हाय. चल!' एकाएकी तात्या शेतावर उगवला. साऱ्या गप्प झाल्या. बायडी मंगीच्या पुढ्यात खुरपं टाकून उठली. तिनं लुगडं झटकलं, डोईचा पदर सारखा केला. काय रं? असा प्रश्न तिच्या मनातला मनातच राहिला. तात्याचं तोंड बगून ती गप्प झाली. त्याच्या मागून डोहावर आली.

'हे लुगडं बदल.' तिनं लुगडं हातात घेतलं आणि टणटणीच्या झुडपाआड जाऊन बदलायला घेतलं. भीतीने तिचे डोळे भरले होते. कोऱ्या लुगड्याचा वास तिच्या नाकात भरला. त्याची जर तिच्या अंगाला टोचली. मनात काहीच येईना. जशी गोठून गेल्यागत झालं तिला.

अंधार दाटायला लागला होता. मावळतीला शुक्र दिसायला लागला. ती अवघडून उभी होती बाया आता गेल्या असतील. तिला एकाकी वाटायला लागलं. चुकल्या कोकरागत झालं, लांडग्याचं भय मनात दाटायला लागलं. थंडी भरून आल्यागत झालं. दातपायातलं बळंच सरलं. तात्या लाब बसला होता. गावातले बापू, नाना, मुरली केव्हा आले ते कळलेच नाहीत, चोरपावलांनी लाडग्यागत. भुईतून उगवल्यासारखे वाटले. रोज भावासारखा वाटणारा तात्या आज बाप्यागत वाटत होता. दबल्या आवाजात त्याची बोलणी चालली होती.

अशी अंधाराची गाठून पोरींची लग्न लावतात हे बायडीला माहिती होतं. तिनं ऐकल होतं. सारजीचा नवरा म्हातारा होता, तर हरणीचा रोगट होता, चतुरी दुसोट्यावर दिली होती. साऱ्याची लग्न अशीच रात्रीची लावली होती. हे तिने बघितलं होतं. पण हे लाडगे आपल्यालाच गाठतील असं नव्हतं वाटलं तिला. बाप एकादा एकर विकील व्यवस्थित लग्न लावून देईन... तिला आशा वाटत असे. आई म्हणायची 'या मुड्याच्या हातून काही घड नाही व्हायचं पर तुझा काका बरा हाय. तो देईल तुझं लग्न लावून.' काका कधी मुबईवरून आला म्हणजे बायडीची चौकशी करायचा. बायडीला त्याचा विश्वास वाटायचा.

'आता कशाचा काका आणि कशाचं काय? आपलं कोणी नाही.'

अंधार डोळ्यात घुसत होता. दूरवर कुत्र्याचे भुकणे ऐकू येत होते. गाव दूर राहिला. कोणाचा आधार नाही, बाप्याचे आवाज आता वाढले होते. त्याना आता कोणाचाच धाक नव्हता सारं गाव गपचिप आपल्या खोपटात बसलं असणार आणि इकडे सारा लाडग्याचा कारभार.

आणखी बाप्याच्या चाहुली आल्या. 'चला, खूप अंधार झाला आता.' बापूचा आवाज आला.

'चला बायडे, तुझ्या पायात साऱ्याची रात्रीची वरात निघालीय' तात्या म्हणाला.

काळा किट्ट अंधार. पुनव होऊन आठ दिवस झाले होते. डोळे ताणून पाय टाकायला लागत होते. बाप्याचा पायतणाचा आवाज होत होता. आप्पांच्या मळ्याला वेढा घालून वाट शिवेवरच्या देवळात गेली. देवळात तेलाचा दिवा पेटवला होता. त्याच्या अपुऱ्या उजेडात सारं भेसूर दिसत होतं. बाप उगीचच इकडे तिकडे करत होता. काहीबाही बोलत होता. गावकीतले दहा बारा बापे जमले होते. दोघंजण नवखे होते.

'वायडे, ये बाय' बापाचा मऊसूत आवाज आला सारे बापे लाडग्यागत दिसत होते. बायडीच्या जीवाचा दगड झाला होता. ती हलत नव्हती का बोलत नव्हती बळी द्यायल्या काढलेल्या बकऱ्यागत थटून बसली होती कोणीतरी तिला बळेच पुढे ओढली. सारे बळेच चाललं होतं.

गावात येईपर्यंत मध्यरात्र झाली होती. गावात शिरताच सारे पांगले. नवरा मुलगा त्याच्या भावकीतल्या घरी गेला. घरात शिरल्या शिरल्या आईनं बायडीला मिठ्ठी मारली ती हंबरडा फोडून रडाय लागली. बायडीचे डोळे कोरडेच होते आईच्या मिठीतून सुटका करून ती भीतीला टेकून बसली. आई गुढग्यात डोक घालून मुसमुसत होती. धाकटा भाऊ आणि बहीण कावरे बावरे होऊन बघत होते.

"उगा गळा काढून सगळ्याना बोलावू नका, न्हाइतर मुस्काट फोडीन' बाप दबल्या आवाजात खेकसला. आईने जमिनीवर अंग टाकले तिला रड आवरेना. शेजारची हौसानानी येऊन आई शेजारी बसली. ती हळूहळू बोलून आईची समजूत काढत होती.

सकाळी लवकर पहिल्या गाडीला जायचंय अस सांगून बाप निघून गेला रकटं घेऊन. आई रडून रडून झोपली होती. सारं सामसूम झालं होतं मगाशी हौसानानी आईला सागत होती. मुलगा तसा चांगला आहे म्हणायचा. पहिली बायकू आहे मामाचीच पोर. पण याला पसंत नाही. लहान १० महिन्याचं प्वार हाय तिला. बायडीला काय कमी नाही पडणार. काम करल आणि खाईल.

बायडीच्या मनात काहूर उठलं. देवळात अपुऱ्या प्रकाशात पाहिलेला तो लांडगा तो नवरा व्हय! असा हा नवरा. बरोबरीची सवत. रोजची भांडण लागल्याला. तिचं डोकं भणभणलं. कशाचा बाप आणि कशाचा हा नवरा. सारे बाप्ये, सारे लाडगे. गळ्यात माळ पडली. आता सुटका न्हाई माझी. माझच हे असं का झालं? तिच्या मनाने आकांत मांडला.

यातून सुटायचं बायडी उठून घराबाहेर आली. कुठं जाग नव्हती. अंधार गिळायला येत होता. घरं भुतागत उभी होती. कुठं जावं? कोण आसरा दील? कशाचा काका! काकानं गेल्या सालीच केलेली लहान नवरी तिला आठवली. त्याला पोरगा हवा होता. त्याची मुलगी लग्नाची झाली होती पण त्यानं परत बायकू केली. ते कशाची मदत करणार.

साऱ्या बाजूने घेरल्यासारखं झालं तिला. सगळ्या बाप्याचे चेहरे अंधारात तिच्या भोवती तरंगाय लागले. त्यांचे हात तिला ओरबाडायला आले. ती पळत सुटली. दगडातून, काट्यातून काही न बघता ती पळत सुटली. तिच्या मागे सारे लागले होते. त्याचे झपावणारे हात हासडत ती पळत होती.

विहिरीच्या उघड्या तोंडाशी ती उभी राहिली. मृत्यूचे थंड हात तिच्या तोंडावरून फिरतो. तिच अंग शहरायला लागला. पायाला कापरं भरलं, तोंडाला कोरड पडली. मागे लांडगे ओरडत होते. त्यांचे विचकलेले दात, तिच्या नरडीवर जणू उडी मारणार ते. विहिरीच्या काळ्या तोंडाकडे ती बघत राहिली. उबदार वाऱ्याची लहर तिच्या अंगावर फिरली. तिचं कापरं थांबलं. अंगावरचे शहारे थाबले. मायेचे ऊबदार पांघरूण तिच्या अंगावर पसरले. इथे लांडगे येणार नव्हते.

सकाळचा सूर्य वर आला होता. विहिरीच्या काठावर सारे जमले होते. बायडी पाण्यावर तरंगत होती. चेहऱ्यावर शातपणा होता. आईच्या कुशीत झोपल्यागत ती झोपली होती. आई मात्र सुन्न होऊन काठावर उभी होती. □


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

**लेखक : वि. ग. कानिटकर**
**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**
**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# सावधान, दक्ष

## वेडगळ धर्मनिष्ठा आणि अंधश्रद्धा यांचे साम्राज्य भारतात पुन्हा येऊ पहात आहे !

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

अमेरिकेत प्रसिद्ध होणाऱ्या 'सायन्स' या नियतकालिकाच्या, एप्रिल १९७९ च्या अंकात पुढील लेख प्रसिद्ध झाला आहे.

व्हिएन्ना येथे पुढील वर्षाच्या ऑगस्ट महिन्यात संयुक्त राष्ट्रसघातर्फे 'प्रगतीकरता शास्त्र आणि तंत्रज्ञान' या विषयावर एक परिषद भरणार आहे. या परिषदेमध्ये ठेवण्याकरिता भारतातर्फे तयार करण्यात आलेले एक प्रदर्शन शोधून काढून त्याची पुनश्च जुळवाजुळव करण्याचे प्रयत्न चालू आहेत. कारण जनतेच्या दृष्टीस हे प्रदर्शन पडण्याआधीच सरकारी एजंटानी ते मोडून टाकले होते.

१४ महिने एका बंदिस्त प्रदर्शनालयात हे प्रदर्शन कुलुपबंद होते. आणि एके रात्री, मुळात हे प्रदर्शन रचणाऱ्या NCERT या संस्थेच्या सागण्यावरूनच त्याची उचलबागडी करण्यात आली. मार्च १९७७ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांचा पराभव करून श्री. मोरारजी देसाई भारताचे पतप्रधान झाले. या बदललेल्या राजकीय परिस्थितीने या प्रदर्शनाचा बळी घेतला असावा. ज्योतिष, बुवा, पारंपरिक किंवा होमिओपाथिक उपचार या गोष्टीना या प्रदर्शनात आव्हान देण्यात आले होते, त्यामुळे पुराणमतवादी राजकारणी मंडळी प्रक्षुब्ध होणे साहजिकच होते.

'सायन्स' कडे या प्रदर्शनाची जी माहिती उपलब्ध आहे, ती फक्त डॉ. पी. एम्. भार्गव यानी अमेरिकेतील आपल्या एका मित्राला या प्रदर्शनाबद्दल बरीच माहिती कळवली होती त्यावरूनच.डॉ. भार्गव यानी या प्रदर्शनाची योजना आखली आणि त्याच्या उभारणीवर देखरेख केली होती. ते स्वतः हैद्राबाद येथील सेल्यूलोज आणि मोलिक्युलर बायॉलॉजी केंद्राचे प्रमुख असून आंतरराष्ट्रीय मान्यता पावलेले शास्त्रज्ञ आहेत.

सर्वसामान्य जनतेकरिता शास्त्रीय पद्धतीची माहिती करून देणे हा या प्रदर्शनामागचा उद्देश होता. त्यावेळी NCERT च्या सचालकानी केलेल्या सूचनानुसार हे प्रदर्शन अनेक माध्यमाद्वारे प्रदर्शित केलेले होते. अनेक शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, कलाकार, चित्रपट बनवणारे, आणि संगीत कलाकार यांच्या सयुक्त प्रयत्नातून तयार झालेल्या या प्रदर्शनाला ३ लाख रुपये खर्च आला होता. पण भारताबाहेर या प्रदर्शनाची व्यावहारिक किंमत १० लाख डॉलर्स सहज होऊ शकली असती. हैद्राबाद येथे उभारणी करण्यात आल्यावर, हे प्रदर्शन १९७७ च्या सुरुवातीस दिल्लीला हलवण्यात आले. तिथे बालभवन सोसायटीच्या कलादालनात त्याची माडणी करण्यात आली. स्वतः पतप्रधान इंदिराजी त्याचे उद्घाटन करणार होत्या, पण तेवढ्यात त्या निवडणूक हरल्यामुळे ते शक्य झाले नाही.

ओघानेच NCERT चे नेतृत्व बदलले, आणि या संस्थेने आपला पाठिंबा काढून घेतला. साहजिकच प्रदर्शन कुलूपबंद होऊन पडले आणि भार्गव बिचारे नवीन त्राता आणि नवीन जागा शोधण्याकरता वणवण करू लागले. अचानक ऑगस्ट महिन्यात एका रात्री १०० माणसे ट्रक घेऊन आली, आणि केवळ ६ तासाच्या अवधीत सर्व काही घेऊन गेली. यात अनेक वस्तूंची मोडतोड झाली असणे साहजिक आहे, कारण सर्व वस्तू योग्य काळजीनिशी बाधायला काही आठवडे लागले असते.

वृत्तपत्रांनी या गोष्टीस बरीच प्रसिद्धी दिली. त्यावर NCERT चे नवे प्रमुख श्री. एस. के. मित्रा यानी वृत्तपत्राना स्पष्टीकरण दिले की, या प्रदर्शनातील विषयाबाबत शास्त्रीय विवाद निर्माण झाले असल्यामुळे ते काढून घेण्यात आले. श्री. मित्रानी सागितले– 'शास्त्रज्ञाच्या काही गटानी काही चित्राबद्दल आक्षेप घेतला. उदाहरणार्थ– प्रकाशापेक्षा जास्त वेगाने जाणारे अणू, टॅकिऑन्स– याचे संदर्भात एका सर्रिॲलिस्ट पद्धतीच्या चित्रात एक विवस्त्र स्त्री स्वप्न पाहत आहे अशी कल्पना चितारली होती. या शास्त्रज्ञाची नावे सागण्यात आली नाहीत, पण त्याबरोबरच अनेक नामवंत शास्त्रज्ञानी या प्रदर्शनाची स्तुतिस्तोत्रे गाईली होती हेही खरे.

अनेक प्रदर्शित विषयामुळे राजकीय लोकाच्या भावना दुखावल्या गेल्या असे म्हणतात. 'हवेतून वस्तू काढणे' या विषयावर प्रदर्शनातल्या एका विभागात हल्ला चढवण्यात आला होता, आणि थर्मोडायनॅमिक्सच्या पहिल्या सिद्धाताशी याचा कसा काय मेळ घालावा याचा विचार करण्याचे प्रेक्षकाना आवाहन करण्यात आले होते. अशाच एका विभागात शास्त्रामध्ये कोणी गुरु वा मध्यस्थ नसतात यावर भर दिलेला होता.

आणखी एका विभागात फलज्योतिषावर आक्षेप घेण्यात आले होते. निरनिराळ्या मासिकातून आलेली एकाच आठवड्याची निरनिराळी भाकिते इथे देण्यात आली होती, आणि शास्त्रीय कसोटीला हे कसे काय उतरते असा प्रश्न करण्यात आला होता. इतरत्र, होमिओपॅथीमध्ये बनवल्या जाणाऱ्या क्षार गुटिकाचे बाबतीत 'शास्त्रीय पद्धत' लावण्यात येते का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

'शास्त्राचा इतिहास' या विभागात सामाजिक संकल्पना आणि आर्थिक नियोजन या विषयाचे आदिशास्त्रज्ञ म्हणून मार्क्स आणि लेनिन याना श्रेय दिले होते, यामुळेही काही जण खवळून गेले.

प्रदर्शनाच्या अखेर 'अंधश्रद्धांनी आमचे जीवन काळवंडून गेले

आहे, त्याचा नि.पात करण्यासाठी आम्ही शास्त्रीय विचारसरणी अनुसरणं आवश्यक आहे.' हे श्रीमती इंदिरा गाधीचे वाक्य होते. पण आता इंदिराजीची सद्दी संपली होती ना !

डॉ भार्गव याचा असा अंदाज आहे की, व्हिएन्ना येथे हे प्रदर्शन माडले जाणार आहे याची कुणकुण लागताच सरकारी अधिकाऱ्यानी ते हिसकावून घेतले. इथे (अमेरिकेत) काम करणाऱ्या एका भारतीय शास्त्रज्ञाने 'सायन्स' ला सांगितले की, ' मोरारजी देसाईंना खूष करण्याच्या इराद्याने कोणीतरी घटिंगण अधिकाऱ्यानी ही कामगिरी बजावली असावी. तुम्हाला माहितच आहे की आमचे पतप्रधान स्वमूत्र प्राशन करतात. पूर्णपणे अशासकीय पायावर आधारित ही चिकित्सा पद्धती आहे.' स्वतः डॉ. भार्गव यांनी मोरारजीना भेटून या प्रदर्शनाबाबत रदबदली केली. पण उपयोग झाला नाही.

भारतामध्ये शासकीय वातावरण निर्माण व्हावे म्हणून झटणाऱ्या ' इंडियन रॅशनॅलिस्ट असोसियशन ' या संस्थेने आता या प्रदर्शनाचे बाजूने आवाज उठवला आहे. या संस्थेच्या एका सभासदाने ' टाइम्स ऑफ इंडिया 'मध्ये पत्र लिहून ' आपला देश दिवसेंदिवस अंधश्रद्धा, दैववाद आणि आर्थिक ढोंगीपणा याच्या कर्दमात रुतत असल्याची तक्रार केली होती. एका सुप्रसिद्ध बुवा महाराजाना त्याच्या चमत्काराचे शास्त्रीयरित्या परीक्षण करून द्यावे असे आव्हान दिल्याबद्दल बगलोर विद्यापीठाच्या उपकुलगुरूंना जबरदस्तीने राजीनामा द्यायला कसा लावला गेला याचीही हकीगत त्यानी दिली होती. डिसेंबर महिन्यात अखेर इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशनने न्यायालयात धाव घेऊन, NCERT ने हे प्रदर्शन मोडणे म्हणजे भारतीय घटनेचा अधिक्षेप आहे असा अर्ज दाखल केला. अशा प्रकारची ही या देशातील पहिलीच कोर्टात गेलेली केस म्हणतात. ( शास्त्रीय विचारसरणीचा ) परिपोष करणे हे आपल्या घटनेत नवीन कलम घालण्यात आलेले आहे.

भारतीय नागरिकाना शास्त्रीय विचारपद्धतीची ओळख करून देणारे हे पहिलेच प्रदर्शन ठरले असते. डॉ. भार्गव याच्या शब्दात या प्रदर्शनाचा हेतू असा होता— ' शास्त्रीय पद्धती ही आपल्या विचाराचा आणि आचरणाचा भागच बनवणे हे किती महत्त्वाचे आहे आणि दैनंदिन व्यवहारातही या पद्धतीचा किती फायदा होऊ शकतो हे दाखवणे. ' पाश्चात्य माणसाला यात गैर काहीच वाटणार नाही; पण या प्रदर्शनाच्या सयोजकाना शंका निर्माण करणे आणि प्रतिप्रश्न विचारणे याना आपण देत असलेले उत्तेजन हे सरकारी अधिकाराला धक्का असल्याचे मानले जाईल, याची पुरेशी कल्पना आली नाही.

या प्रकरणाच्या भारतीय वृत्तपत्रात आलेल्या हकीकतीत एक प्राध्यापक सरकारी विरोधाचे स्पष्टीकरण देताना सागतात— ' आपल्या तत्त्वज्ञानामध्ये ' खरीखुरी शंका ' (Genuine doubt) या प्रकाराची परंपराच नाही. स्वीकार, नकार किंवा तटस्थता एवढेच आम्हाला मान्य. शका घेणे किंवा प्रश्न उपस्थित करणे नाही. फार काय पाश्चात्य तत्त्वज्ञानातसुद्धा ' शंका ' हा प्रकार अलीकडे अलीकडे रोजर बेकनपासून सुरू झाला. '

न्यूयॉर्क येथील council on international and public affairs चे अध्यक्ष वॉर्ड मोरहाऊस हे स्वतः हे प्रदर्शन पाहून फारच प्रभावित झाले होते. ' गेल्या ३० वर्षांत निदान काही थोड्या विकसनशील देशात शास्त्र हे परिपक्व अवस्थेला पोहोचले आहे, हे दाखवण्याचा हे प्रदर्शन हा फार सुरेख मार्ग होता आणि हा सदेश पूर्णपणे पटण्याकरता, कोणा तरी विकसनशील राष्ट्राकडूनच यायला हवा आहे. 'पण जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही राष्ट्राकडून तो येईल की नाही याची शका आहे.' ( Fare thought–Madras, Nov. 79 सौजन्याने )

□

पुण्यामध्ये गेल्यावर्षी काही तरुण मंडळींनी गणेश या दैवताचा पुरातन कालापासून चालत आलेला इतिहास चित्ररूपाने मांडणारे एक प्रदर्शन स प. महाविद्यालयात भरवले होते. यातील माहिती ही पूर्णपणे प्राचीन वेद, पुराणे, पोथ्या इ. ग्रंथातून घेतली असल्यामुळे ती खोटी आहे असे कोणालाच म्हणता आले नसते. गणपती या दैवताबद्दल प्रचलित असणाऱ्या कल्पनाच्या अगदी विरुद्ध टोकाच्या कल्पना पूर्वी या दैवताचे बाबतीत होत्या. उदाहरणार्थ, ही देवता विघ्नकर्ती समजली जाई. तिला मांस, मद्याचा नैवेद्य आवश्यक मानला जाई. हे अर्थातच या प्रदर्शनात दर्शविले होते. पण आम्ही म्हणू तोच धर्म आणि म्हणू तीच संस्कृती असे मानणाऱ्या काही दुष्टाचार्यांना हे प्रदर्शन सहन झाले नाही. हुकूमशाहीविरुद्ध लढण्याच्या अभिनिवेषाने राजकारणात उतरणाऱ्या या मंडळींनी काय केले असावे ? सत्याग्रह ? छे ! प्रतिप्रदर्शन ? बिलकूल नाही. सभा ? नाव कशाला ! एक दिवस झुंडीने येऊन त्यानी हे प्रदर्शन मोडून उधळून लावले. संयोजकांना मारहाण केली. सर्वांत वाईट म्हणजे कोणीही वृत्तपत्रानी या दडपशाहीविरुद्ध आवाज उठवला नाही. राजकीय हुकूमशाहीविरुद्ध कंठस्वराने ओरडणाऱ्या वृत्तपत्राना काही धार्मिक बाबीतल्या गुंडशाही विरुद्ध वा अत्याचाराविरुद्ध आवाज उठवायचा म्हटले की, कापरे भरते हा अनुभव मला बरेच वेळा आला आहे. त्याचे काही नमुने !

## कहाणी लिंगपूजेची

शिवलिंगाची पूजा करण्याच्या, हिंदूधर्मात अद्यापही प्रचलित असणाऱ्या अत्यंत अश्लील आणि घाणेरड्या पद्धतिविरुद्ध जबरदस्त टीका करणारा एक लेख मी ' मनोहर ' साप्ताहिकाकडे पाठवला होता. लिंगपूजेची पद्धत मूळची काही अनार्यांची. ती आर्यांना काही कारणपरत्वे स्वीकारावी लागली. आज ती चालू ठेवण्याचे काहीच कारण नाही. पु. ग. सहस्रबुद्धे यानी या विषयावर ३०-४० वर्षापूर्वी किर्लोस्कर मासिकात लेख लिहिले होते. लहान मुलीबाळीपासून वृद्ध स्त्रियापर्यंत सर्वांनी गध, फुले, अक्षदा वाहून, कितीही महा असला तरी देवाच्या लिंगाची पूजा करणे ज्याना चालते, त्याना सखाराम बाईंडर सारखे नाटक अश्लील आहे म्हणून बंद पाडण्याचा अधिकार कसा काय पोचतो ? रुद्र स्तोत्राचे मूळ, त्याचा खरा अर्थ इ. बरेच मुद्दे या लेखात होते. ' मनोहर 'च्या सपादकानी हा लेख अतिशय उत्कृष्ट असल्याचे आणि आपण तो लवकरच प्रसिद्ध करत असल्याचे कळवले. पुढे काय चक्रे फिरली कोणास ठाऊक ! हा लेख काही प्रसिद्ध झाला नाही. मी पुन्हा पुन्हा स्मरणपत्रे पाठवली. प्रसिद्ध करायचा नसल्यास लेख परत पाठवा म्हणून कळवले. पण काहीही प्रतिसाद नाही. मजजवळ लेखाची प्रत नव्हती. त्यामुळे

मला तो इतरत्रही प्रसिद्ध करता येईना.

□

## कोणाचा अभिमान धरायचा ?

मी काही कोणी फार मोठा लेखक नाही. वेधक विषयावर लेखन हे माझे क्षेत्र. पण काही सामाजिक, राजकीय वा आर्थिक विषयावर मी वाचकांच्या पत्रव्यवहारात लिहितो. माझी पत्रे बहुधा प्रसिद्ध होतात, पण असा एखादा वादविषय ठरणारा धर्माविषयी मुद्दा त्यात असेल तर ती अजिबात प्रसिद्ध होत नाहीत, असा माझा अनुभव आहे.

मध्यंतरी स्कायलॅब कोसळण्याची शक्यता निर्माण झाली होती. भारतातल्या काही विक्षिप्त पंडितांनी हे सकट टाळण्याकरता ठिकठिकाणी गायत्री मंत्राचा जप चालू केला होता. या अत्यंत अशास्त्रीय, मूर्खपणाच्या आणि लोकाना खोटे समाधान प्राप्त करून देणाऱ्या प्रकाराविरुद्ध खणखणीत टीका करणारे माझे पत्र 'सकाळ 'ने प्रसिद्ध केले नाही. अन्य कोणी वृत्तपत्रांनीही या धर्मपंडिताचे विरुद्ध आवाज उठवला नाही.

. दोन वर्षापूर्वी राजस्थानात कृष्णचंडी का कोटीचंडी असला एक प्रचंड यज्ञ करण्यात आला होता. सत्तारूढ जनता पक्षाचे अनेक अध्वर्यू या यज्ञाला उपस्थित होते. सहस्रावधी किलो तूप, तेल, धान्य या यज्ञात जाळून टाकण्यात आले. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या आणि सरकारी साहाय्य लाभलेल्या या गाढवपणाविरुद्ध मी लिहिलेले प्रखर टीका करणारे पत्र 'सकाळ', 'केसरी' आणि 'तरुण भारत' या तिघानीही प्रसिद्ध केले नाही.

इथे 'तरुण भारत 'बद्दल एक गोष्ट मान्य करावयास हवी. 'अग्निहोत्रामुळे शेती उत्पादन वाढते' असा पूर्णपणे अशास्त्रीय सिद्धात माडणाऱ्या त्यातील एका लेखावर आक्षेप घेणारा आणि पूर्ण शास्त्रीय विवेचनाने त्यातील अनुमानाच्या चिंधड्या उडवणारा माझा लेख त्यानी ठळकरीत्या प्रसिद्ध केला होता. चं. प. भिशीकराच्या काही लेखाच्या विरुद्ध केलेले प्रतिवाद मात्र प्रसिद्ध झाले नाहीत.

काही महिन्यापूर्वी मानवत खून खटल्यातील दोषी ठरलेल्या आरोपीना शिक्षा झाली. त्या अनुषगाने ही फाशी या अपराध्याना नसून बळी वगैरे कल्पना मानणाऱ्या हिंदूधर्मालाच आहे असे एकाने 'केसरी 'मध्ये पत्र लिहिले. त्यावर अनेकानी प्रतिवाद करून हिंदूधर्म कसा श्रेष्ठ आहे हे पटवण्याचा प्रयत्न केला. श्री. करमरकर नावाच्या एका वाचकाने तर 'आजकाल जो उठतो तो हिंदूधर्मावर टीकेची झोड उठवतो, अशी आजची फॅशनच झाली आहे. पण आम्हाला आमच्या धर्माचा अभिमान वाटणारच' असे आर्ग्युमेंट केले होते. या पत्राला दिलेल्या उत्तरात मी लिहिले होते—

'परमेश्वरापुढे बळी दिल्याने तो आपले कल्याण करतो ही आजही लक्षावधी हिंदूची ठाम कल्पना आहे. शका असणाऱ्यांनी माढरदेवीच्या जत्रेत कापले जाणारे हजारो बोकड पहावेत. ही काय मोठी अभिमान वाटण्यासारखी गोष्ट आहे ? धर्माचा अभिमान असावा; पण त्याचबरोबर धर्माच्या नावाखाली असणाऱ्या मूर्ख आणि घातक समजुतीबद्दल लाज आणि चीड वाटली पाहिजे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, आज अभिमान वाटण्यासारखं हिंदू धर्मात फारसे काही नाहीच आहे. का आम्ही आंबेडकरांच्या नावाला विरोध करून दलिताची घरे जाळणाऱ्याचा अभिमान धरायचा ? का आपले पाप धुवून जाईल या भाबड्या कल्पनेने ठराविक दिवशी ठराविक नदीत बुड्या मारणाऱ्याचा धरायचा ? का तिथे मानासाठी मारामारी करणाऱ्या साधूचा धरायचा ? का अस्पृश्यांची दिंडी अलग ठेवू पाहणाऱ्या वारकऱ्याचा धरायचा ? का यल्लाम्मा देवीला सोडल्या जाणाऱ्या वेश्याचा धरायचा ? का बनावट चमत्कार दाखवून स्वत:जवळ ईश्वरी सामर्थ्य आहे अशी धूळफेक करणाऱ्या बुवांच्या धरायचा का गाईला देवता मानून तिला उपाशी मरू देणारांचा धरायचा ? अजूनही कोट्यावधी रुपये खर्चून हजारो टन तूप, धान्य जाळणाऱ्या यज्ञाचा धरायचा ? का मुंजीसारख्या कालबाह्य 'सस्कारासाठी' हजारो रुपये उधळणाराचा धरायचा ? का हुंड्या अभावी अविवाहित राहणाऱ्या व जीव देणाऱ्या तरुणीचा धरायचा ? का सौभाग्यासाठी झाडाची पूजा करणाऱ्या सुशिक्षित स्त्रियाचा धरायचा ? एक दिवस नागाची पूजा करून इतर वर्षभर दिसला कुठलाही साप की मार असे करणारांचा धरायचा ? का स्वर्गातील आत्मे तृप्त व्हावेत म्हणून पृथ्वीवर ब्राह्मणाना मिष्टान्न भोजन घालणाराचा धरायचा ? का कुठल्याही घाणीत तोंड घालणाऱ्या गाईची शेपटी भक्तिभावाने डोक्यावरून फिरवणाराचा धरायचा ? का अंगात आलेली भुते मारहाण करून उतरवणाऱ्या मांत्रिकाचा धरायचा ? का क्रिकेट सामन्याचे वेळी पाऊस पडू नये म्हणून तिरुपतीची आणि मैदानाची पूजा करणाऱ्याचा धरायचा ? का स्कायलॅब कोसळू नये म्हणून गायत्री मंत्र जपणाराचा धरायचा? का ग्रहण सुटावे म्हणून दान देणाऱ्या दानशूराचा धरायचा ? का समाधीच्या नावाखाली सर्व प्रकारचे भोग शिकवणाऱ्या भागवताचा धरायचा ? का चार हाताच्या सोंड असणाऱ्या काल्पनिक देवाचे उत्सवापायी कानठळ्या बसणारे लाऊडस्पीकर लावून लक्षावधी रुपये उधळणाऱ्याचा धरायचा ? का बगाडला टागून घेणे, लोळण घेत यात्रा करणे असले अघोरी नवस करणाराचा धरायचा ? का या सर्वांकडे ढुकूनही न पहाताना हजारो रुपये किमतीच्या चांदीच्या उपकरणानी पूजा अर्चा करत बसणाऱ्या शकराचार्यांचा धरायचा ! का यापैकी कुठल्याही भोळसर समजुती विरुद्ध अवाक्षरही न उच्चारता 'आम्ही हिंदू संस्कृतीचे संरक्षक' म्हणून 'दक्ष-आराम' करत रहाणाऱ्यांचा धरायचा ? "

सागायला नकोच की हे पण 'केसरी'ने प्रसिद्ध केले नाही. फार काय 'कशाला धार्मिक भावना दुखवा' या सबबीखाली मी काढलेले एक हास्यचित्र प्रसिद्धीला मुकले होते. छोट्या कृष्णाला 'बघू तू लोणी खाल्लंस का' असे विचारून यशोदा आ करायला सांगते या सुप्रसिद्ध प्रसंगाचे चित्र काढून मी यशोदेच्या तोंडी शब्द टाकले होते—'अरेच्या तुझ्या टॉन्सिल बऱ्याच वाढलेल्या दिसताहेत !' हे निरुपद्रवी हास्यचित्रही नापास करणारे संपादक होते— खुद्द 'माणूस 'चेच !

□

## क्रिकेट, पाऊस आणि देव

क्रिकेट सामन्याचे वेळी पाऊस येऊ नये म्हणून पूजा घालणाऱ्या असोसिएशनला काय म्हणावे ? बंगलोर येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या कसोटी पूर्वी हा प्रकार घडला होता. मी स्वतः कर्नाटक क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षाना याबाबत पत्र पाठवले होते ते

असे--(मूळ इंग्रजीत )

'आपल्यासारख्या सुशिक्षित आणि समजदार मंडळींनी क्रिकेट सामन्याचे वेळी पाऊस पडू नये म्हणून तिरूपती वेकटेशाची पूजा आणि मैदानाची पूजा केल्याचे वृत्तपत्रात वाचून फार वाईट वाटले. हे खरे नसावे अशी जबर आशा आहे. जर खरे असेल, तर आपण खरोखर पाऊस हा तिरूपती वेंकटेश्वराचे इच्छेनुसार पडतो अथवा थाबतो असे मानता काय हे जाणण्याची मला उत्सुकता आहे. आणि समजा तसे असले, तरी पूजा केल्यामुळे तिरूपती आपला विचार बदलेल असे तुम्हाला वाटते का? समजा विरुद्ध हेतू मनात धरून दुसऱ्या कोणी अशीच पूजा केली तर काय होईल?

आजकाल शाळा कॉलेजमधून 'भूगोल' या नावाचा एका विषय शिकवला जातो हे आपल्यापैकी कोणाच्या तरी कानावर आलेच असेल. पाऊस आणि वादळे आणि भरती ओहोटी कशी होते याचे स्पष्टीकरण असते म्हणे या विषयात. यात अर्थात कुठेही तिरूपती वेकटेश्वराचा उल्लेख नाही; पण तुमची स्वत.ची पूजा पाठाची संकल्पना मांडून तुम्हाला या विषयात मोठी सुधारणा घडवून आणता येईल. का शास्त्रीय विषयातले प्रगत शिक्षण घेऊनही काही दुराग्रही तिरूपती भक्त जसे म्हणत रहातात की 'शास्त्र ते शास्त्र, आणि तिरूपती तो तिरूपती' आणि मग जन्मभर अशास्त्रीय असंयुक्तिक आणि सरळ सरळ मूर्खपणाच्या अंधश्रद्धाना चिकटून रहातात, त्यातलेच तुम्ही आहात? आपला पैज आहे की स्कायलॅब कोसळण्याचे वेळी गायत्री मत्र म्हणत बसणारात तुम्ही असणारच! का तुमच्या मते तिरूपती वेकटेशाकडेच कुठलेही संकट निवारण्याचे एकाधिकार आहेत? पार स्कायलॅबपासून ते क्रिकेटच्या वेळच्या पावसापर्यंत!

आपल्या देशातील बहुसंख्य लोक हे अज्ञान आणि अंधश्रद्धा यानी ग्रासलेले आहेत. पावसासारख्या नैसर्गिक गोष्टीवर नियंत्रण ठेवण्याच्या असल्या मूर्खपणाच्या पद्धतीना उत्तेजन देऊन तुम्ही या अज्ञजनाच्या अंधश्रद्धाना खतपाणी घालत आहात आणि देशाचे केवढे नुकसान करीत आहात, ते कसे तुमच्या लक्षात येत नाही? भारतीय सघाचा विजय व्हावा म्हणून देखील तुम्ही तिरूपतीची प्रार्थना केली असेल! किती हजार कबूल केलेत त्या करता? आहो, या ऑस्ट्रेलियन लोकानी तुम्हाला वेडयात काढलं असणार आणि तुमच्या या जादूटोण्याची जगभर जाहिरात होणार नक्कीच! या देशातील बुद्धिवाद्यांची आपण माफी मागितली पाहिजे असे नाही तुम्हाला वाटत? मेहेरबानी करून आपल्या देशाच्या भल्याकरता असल्या निरर्थक गोष्टीचा पायडा पाडून इतर क्रीडा संघटनांना घडे घालून देऊ नका! अन्यथा बगलोरमधील सुबुद्ध लोकाना खासगी चक्रमपणासाठी सार्वजनिक पैसा खर्च करण्याच्या तुमच्या या आचरटपणाविरुद्ध मोर्चा काढावा लागेल.

उत्तराची अपेक्षा नाहीच.

आपला इ.'

अपेक्षेप्रमाणे उत्तर आले नाहीच. या पत्राची प्रत मी Indian Express कडे पाठवली होती. पण तेही प्रसिद्ध झाले नाही.

□

## देवरसांना पत्र

काही दिवसापूर्वी जनता पक्षातील दुहेरी निष्ठाचा वाद उफाळून आला होता त्यावेळी संघाचे नेमके स्थान व कार्य काय असावे याबाबत चर्चा चालू होती. त्यावेळी श्री. बाळासाहेब देवरस यानी संघाने केवळ आपद्धर्म म्हणून आणीबाणीविरोधी राजकारणात भाग घेतला होता, एरवी संघ ही मूलतः सांस्कृतिक संघटना आहे असे सांगितले होते. त्याचवेळी सावरकर वसतिगृहाचे उद्घाटनाचे वेळी त्यानी सावरकर प्रणित आधुनिक विज्ञाननिष्ठ विचारसरणी आपल्याला मान्य असल्याचे सांगितले होते. त्यावेळी मी त्याना एक पत्र पाठवून हिंदू समाजातील वेडगळ धार्मिक समजुती आणि अंधश्रद्धा नष्ट करण्याकरता संघाने काम करावे असे सुचवले होते. या पत्राचे उत्तर तर राहोच, पोचही आली नाही. नागपूरचे माझे एक मित्र, कट्टर संघ कार्यकर्ते श्रीपाद चितळे याना मी या बाबत कळवले. त्यांनी स्वतः देवरसांना भेटून माझ्या पत्राचे उत्तर पाठवायला लावतो असे मला लिहिले. पण आजवर उत्तर नाही. मी पत्र लिहिले होते ते असे--

वाई, दि. २१ सप्टेंबर १९७९

**श्री. बाळासाहेब देवरस यांना सप्रेम नमस्कार**

आपली प्रत्यक्ष ओळख नसताना आपणाला पत्र पाठविण्याचे धाडस करीत आहे. याबद्दल क्षमस्व. प्रथमच हे स्पष्ट करतो की, मी कोणी रा. स्व. संघाचा चाहता नाही; उलट ही एक संकुचित, परंपराभिमानी, धर्मनिष्ठ आणि कालबाह्य विचार करणारी एक संघटना आहे असे मी मानत होतो; पण गेल्या काही वर्षात विशेषतः आपण या संस्थेची सूत्रे घेतल्यापासून संघीय मनोवृत्तीत व रचनेत झपाट्याने चांगले बदल घडून येऊ लागले आहेत, यात शंका नाही. विशेषतः आध्र-मोरवी येथील सघ-स्वयंसेवकांचे काम, हिंदू शब्द बदलून भारतीय शब्दाला आपली मान्यता, अन्य धर्मियाना संघात प्रवेश आणि नुकतीच राजकारणापासून दूर राहण्याची आपण केलेली घोषणा-यामुळे संघाबद्दल अनेकाचे मत आता बदलेल; आणि सघाचे कार्य जोमाने वाढेल अशी खात्री वाटते.

आता राजकारणापासून दूर राहून संघ सामाजिक व सांस्कृतिक कार्य करणार म्हणजे नेमके काय करणार असा अनेकांना प्रश्न पडेल मोठमोठ्या आपत्ती काही वारंवार येत नाहीत. त्या दृष्टीने आपल्याशी थोडी मनमोकळी चर्चा करण्याची संधी द्यावी.

नुकतेच नाशिक येथे वीर सावरकर वसतिगृहाच्या उद्घाटनप्रसंगी निधर्मीपणाचे सोग आणून प्रत्यक्षात चुकीच्या कल्पना व अशास्त्रीय कल्पना बाळगणाऱ्याचे वर आपण यथार्थ टीका केली होती, मी स्वतः सावरकराचा एक चाहता आहे; आणि त्यांनी केलेल्या राजकारणापेक्षा समाजकारणाला जास्त किंमत दिली पाहिजे, असे मानणारा आहे. दुर्दैवाने सावरकराचे विज्ञाननिष्ठ, अंधश्रद्धा निर्मूलक, परंपराविरोधी सामाजिक विचार आज समाजाला अत्यावश्यक असूनही कोणीही त्याचा पाठपुरावा करीत नाही असे आढळून येते. यापुढे संघाने हे कार्य अंगिकारले आणि अज्ञान, अंधश्रद्धा आणि चुकीच्या धर्मकल्पना यांनी ग्रासलेल्या या भारतीय समाजात बुद्धिप्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठ आणि मानवतावादी विचाराचा सूर्यप्रकाश

दाखवावा अशी आपल्याला कळकळीची विनंती आहे. सावरकराचे विचारांबद्दल सर्व स्वयंसेवकांना अभिमान असतो त्यामुळे या कार्याला कोणाचाही विरोध असल्याचे कारण नाही. जनसामान्यात शास्त्रीय दृष्टीकोनाची जोपासना करणे हे आपल्या घटनेनेही स्वीकारलेले तत्त्व आहे. त्यामुळे शासनाचाही त्याला विरोध असण्याचे कारण नाही. या दृष्टीने सावरकराचे *लिखाणावर, आधारित पुढील* कार्यक्रम आपल्याला सुचवीत आहे.

१. यज्ञसंस्था ही कालबाह्य झालेली आहे. आजही कोटयवधी रुपये खर्चून, हजारो टन धान्य जाळून मोठमोठे यज्ञ केले जातात. कोणीही संघ बंधूने या प्रकाराला मदत करू नये, उलट प्रकट विरोध करावा.

२. गोवधबंदी हे खूळ आहे. त्याविरुद्ध आवाज उठवून त्याऐवजी शास्त्रशुद्ध गोपालनाचे धडे खेडयापाडयातून द्यावेत.

३. सत्यनारायण ही देवाला देऊ केलेली लाच आहे. कोणीही संघीयाने सत्यनारायण करू नये. अन्य कोणी केल्यास तेथे जाऊ नये.

४. ग्रहण काळात मदत केल्याने ग्रहण सुटले ही कल्पना अशास्त्रीय आहे. कोणीही अशा वेळी दानधर्म करू नये.

५. श्राद्ध–बारावा–तेरावा वगैरे खुळचट विधी बंद करावेत. त्या करिता खर्च होणारा पैसा योग्य त्या सामाजिक कार्यास द्यावा.

३. तिरडीवर प्रेत नेणे हे अघोरी आहे. तसेच लाकडे, गोवऱ्या वापरून प्रेत दहन करणे म्हणजे वनसंपत्तीचा आणि खताचा दुरुपयोग करणे आहे. शक्यतो प्रेतवाहक गाडी व विद्युत्दाहिनीचा वापर करावा.

७. मुहूर्त वास्तुशांत – उदकशांत असल्या अशास्त्रीय कल्पना सोडून द्याव्यात.

८. मत्स्योत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करून आहारात उत्तम प्रथिने वाढवण्याचा प्रयत्न करावा.

९. ज्योतिष, हस्तमुद्रिक. पत्रिका इ. प्रकार कसे अशास्त्रीय व खोटे आहेत हे सामान्य जनाना पटविण्याचा प्रयत्न करावा.

१०. आधुनिक चमत्कारवाल्या बुवाची बुवाबाजी उघड करण्याचा अथवा त्याना विरोध करण्याचा प्रयत्न करावा.

११. आत्मा वगैरे सर्व अशास्त्रीय कल्पना असल्यामुळे कोणत्याही मृत्युनंतर 'परमेश्वर मृतात्म्यास शांती देवो.' असले शब्द वापरू नयेत.

१२, भूतबाधा होणे, भुते उतरविणे, अंगात येणे, मूठ मारणे, देवाला कौल लावणे इत्यादी भ्रामक समजुती ग्रामीण भागातून नष्ट करण्यात पुढाकार घ्यावा.

१३. वगाड, दंडवत घालत यात्रा करणे असले अघोरी धार्मिक विधी बंद करावेत,

१४. भुत्या, कडकलक्ष्मी इ. विक्षिप्त भगतगणाना उत्तेजन देऊ नये. हे थोडेफार महत्त्वाचे काही कार्यक्रम सुचविले आहेत असे शेकडो अवलबिता येतील. कृपया यावर विचार व्हावा. –उत्तर यावे.

आपला,

**डॉ. शरद अभ्यंकर**

या सर्वावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही की, धार्मिक पायावर आधारित, कालबाह्य, निरुपयोगी, खर्चिक, अशास्त्रीय आणि अगदी वेडगळपणाच्यासुद्धा अंधश्रद्धाना प्रकट विरोध करावयास कोणी तयार नाही. वृत्तपत्रे नाहीत, विचारवंत नाहीत, धर्मपंडित तर नाहीतच, संघवालेही नाहीत. उलट गोवधबंदी, सत्यनारायण, मुंज यज्ञ वगैरे प्रकार त्यांना भारतीय संस्कृतीची आणि हिंदू धर्माची अविभाज्य अंगे वाटतात, प्रखर बुद्धिवादी, विज्ञाननिष्ठ आणि अंधश्रद्धा विरोधी असे एकही दैनिक, साप्ताहिक, मासिक आज महाराष्ट्रात नाही. उलट धर्मप्रवण, अध्यात्मप्रवण, अशा मासिकांची चलती आहे तेव्हा आज पहिली गरज आहे ती समाजाचे सुयोग्य प्रबोधन करू शकणाऱ्या अशा एखाद्या वृत्तपत्राची, 'माणूस'ने हे कार्य करावे एवढी इच्छा प्रदर्शित करून हा लेख पूर्ण करतो. □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

पुस्तके

# खजिन्याची विहीर

**अनुभवाची भावलय जपणारे नाटक**

रॉय किणीकर म्हणताच आपणास आठवते ते त्याचे धुंद आणि मनस्वी कविमन व त्यांची कविता. त्यामुळे त्यानी 'खजिन्याची विहीर' नावाचे नाटक लिहिले आहे हे कळताच आपणास क्षणभर अचंबा वाटतो. तथापी लगेचच आपणास किणीकराचे 'ये ग ये ग विठाबाई' हे महाराष्ट्र राज्याकडून लेखन-पुरस्कार प्राप्त झालेले नाटकही आठवते. 'खजिन्याची विहीर' हे किणीकराचे दुसरे नाटक. या नाटकात मृत्यूची अटळता, ऐहिक अशाश्वती, संस्कृतीमधील दंभ व कर्मकाडांचा भोगळपणा, अज्ञात नियतीचे सामर्थ्य, दुःखाचा विसर पडण्यासाठी विस्मृतीची समाधी, वर्तमानातील सुख उपभोगण्याची वृत्ती, स्त्री सुख-प्रेम, शिवाय अनिश्चित भविष्यकाळ आणि ह्या सर्वांपलीकडील सतत पोखरणारी लाइफमधील ॲबसर्डिटी यात्रे दर्शन घडविण्याचा हेतू आहे.

विनू ही या नाटकातील प्रधान व्यक्तिरेखा. विनू जीवनातील नसतेपणाला कंटाळलेला आहे हा नसतेपणा त्याला बोचत असल्याने तो मृत्यूजवळ जाऊ इच्छिणारा, आत्महत्येला उत्सुक असा झाला आहे. जीवनात 'नसतेपण' आहे; मग मृत्यूत काय आहे याचा सशोध त्याने चालविलेला आहे. या त्याच्या धडपडीतून जीवन आणि जीवनाची सीमारेषा असणारा मृत्यू याविषयी अनेक प्रश्न विनूसमोर उभे असतात. सदू ही विनू या व्यक्तिरेखेला पूरक असणारी व्यक्तिरेखा किंवा विनूचीच प्रतिवादी भूमिका म्हटले तरी चालेल. कारण विनू, त्याची नसतेपणाची जाणीव, त्याची मृत्यूचे आकलन करून घेण्याची धडपड या साऱ्या गोष्टी आकारतात त्या नाटकातील सदूच्या अस्तित्वामुळेच. विनू आणि सदू याच्या सह-संवादातून 'खजिन्याची विहीर' मधील जीवनातील ॲबसर्डिटीचे नाटच उभे राहत जाते. कावळे-गुरुजी आणि पोस्टमन ह्या व्यक्तिरेखा आणि पिंपळवृक्ष आणि विहीर ही प्रतीक-योजना या जीवननाटयात रंग भरत जातात. (खरे तर रंग उडालेल्या जीवनाचे अधिक विटके स्वरूप सुस्पष्ट करतात.)

विनूचा मृत्यूशी झालेला संवाद हे या नाटकाचे मर्मस्थान म्हणावे लागेल. हा संवाद एकाच वेळी विनूचे 'आत्म, जीवन, मृत्यू, नियती इत्यादी अनेकाशी 'बोलणारा' आहे. या संवादामुळे हे नाटक एकाच वेळी अर्थपूर्ण होते आणि चाकोरी बाहेरचेही होते. यामुळेच या नाटकाची प्रकृती न-नाटयाकडे झुकणारी झाली आहे. या प्रकाराला नाटककार किणीकरापेक्षा कवी रॉय किणीकरच जास्त-करून कारणीभूत आहेत. या नाटकातील कितीतरी जागा नाटककार किणीकरावर मात करून कवी किणीकरानी बळकावल्या आहेत.

हा असाच याला मरावयाची भीती ।
बाधून राहतो एकाताच्या भिंती ॥
नागवाच येतो, नागवलो का म्हणसी ।
गंगेत बुडाली गंगेची रे कळशी ॥

किंवा—

या इथून गेले यात्रिक अपरंपार ।
पाठीवर ओझे छोटासा संसार ॥
किती शिणले, दमले म्हणता माझे माझे ।
वाकले, मोडले, गेले टाकूनि ओझे ॥

अशा अनेक जागा काव्यात्म भाषेने घेतलेल्या असल्याने या नाटकात एक सुदर भावलय जमली आहे. जे 'अबसर्ड' आहे, ते शब्दप्रधान गद्यात कसे पकडता येईल? ते अभिव्यक्त करण्यास शब्दांचा मितव्यय असणारे काव्यच हवे. त्यामुळे येथे थिएटर ऑफ अबसर्डस् आणि थिएटर ऑफ लिरिक (लिरिकल ड्रामा) यांचे एक मनोज्ञ मीलन झालेले दिसते किणीकराना कवितेतून जे जाणवले ते त्यांनी नाटकाच्या आकारात मांडले. पण काव्यात्म आकार आणि नाटयात्म आकार याचे येथे एकमेकावर आक्रमण न होता त्यांचे परस्परपोषण होऊन एक सुदर भावनाटय जन्मले आहे. त्यामुळे अनुभवाची भावलय जपताना नाटकाचा आकार हरवला गेला नाही आणि नाटकाचा आकार जपताना अनुभवाची भावलय पिंजली गेली नाही. येथेच आणखी एक महत्त्वपूर्ण गोष्ट सागितली पाहिजे. ती म्हणजे ह्या नाटकाला आकार देताना किणीकरांनी त्याच्या रंगमूल्याकडे दुर्लक्ष केलेले नाही. किंबहुना त्यांनी त्यांच्या रंगमचावर होणाऱ्या प्रयोगाकडे विशेष लक्ष दिलेले आहे. ही गोष्ट केवळ कंसातील रंगसूचनांच्या आधारे सिद्ध होणारी नाही तर रंगमचावर त्यानी उपयोजिलेली प्रतिके आणि नेपथ्य याहीवरून लक्षात येणारी आहे. ह्या रंगसूचना आणि ही प्रतीके आशयाशी एकरूप असावीत अशी किणीकराची धडपड आहे. उदा. अंक २ मधील ही रंगसूचना (पृ. २९) पहा : विनू पिंपळपाराच्या समोरच्या भिंतीला पाटी अडकवतो. पाटीवर अक्षरे असतात—

विनायक आत्माराम सुखात्मे
येथे राहतात
IN — OUT
आहेत — नाहीत
आणि यापुढेच लगेच विनू गाऊ लागतो
**या इथे कुणाला माहित नाही गाव**
**नाहीच विचारित कुणी कुणाला नाव**

विनूने 'आहेत — नाहीत'ची पाटी लावणे आणि त्यापुढे लगेचच येणाऱ्या या ओळी यातून जे विसंगती दर्शविणारे सुसंगत चित्र निर्माण होते, ते लक्षणीय आहे. तात्पर्य, किणीकर नाटकाच्या प्रयोगमूल्यावर लक्ष ठेवून आहेत. ते प्रयोगमूल्य पुन्हा आशय घनदाट करणारे असेच आहे.

अशा रीतीने 'खजिन्याची विहीर' हे एका कवीने लिहिलेले नाटक आणि एका नाटककाराने लिहिलेले काव्य आहे. या नाटकाचा प्रयोग निश्चितपणे रॉय किणीकरांच्या मनात जागृत झालेला नाटयानुभव रसिकमनात संक्रात करणारा ठरेल असा विश्वास वाटतो.

—प्रा. सुमकौशल दत्त

**खजिन्याची विहीर**
रॉय किणीकर
श्रीशब्द प्रकाशन, पुणे
पृष्ठे : ६०, मूल्य : सात रुपये

# ‘ किक ’

## मराठी कथांचे आगळे दालन

एकांकिकाकार म्हणून नाव ठाऊक असलेल्या वामन पात्रीकरांचा हा कथासंग्रह. पहिलाच कथासंग्रह. तो वाचून लेखकाचा प्रांत हा की तो प्रश्न पडतो. त्यांच्या ‘पुडलीक शेट्टीवार’ या एकांकिकेचा प्रयोग मुंबईत पाहण्याचा योग आला होता. त्यानंतर हा कथासंग्रह वाचण्यात आला. या दोहोत.' एक सुसूत्रता आढळली – शैलीचे नाविन्य ‘पुडलिक शेट्टीवार’ ही ध्वनी – प्रकाश माध्यमात लिहिलेली बहुधा पहिलीच मराठी एकांकिका. ‘किक, सग्रहातील अल्पदान, महापुण्य, वाचस्पती, किक, बाजार पेठ, ओळख, या कथाची शैली अशीच अनोखी आहे. केवळ वैचित्र्यपूर्णच नव्हे तर कथा वस्तूला चपखल बसणारी आहे. इतर कथातूनही कथानक कोणत्या प्रकारे फुलवावे हे तंत्र लेखकाने पूर्णपणे आत्मसात केले आहे त्याची खात्री पटते. कथासूत्रे आणि त्याची माडणी यात खूपच विविधता आहे. ‘किक’ मराठी कथाचे आगळे दालन उघडून दाखवितो यात वाद नाही.

संग्रहातील कथापैकी सुमारे निम्म्या कथा ‘सत्यकथे’तून प्रसिद्ध झाल्या आहेत; पण म्हणून सर्वसामान्य वाचकांना ह्या क्लिष्ट अनाकलनीय वगैरे वाटतील असे नाही. वेगळे विषय, वेगळा घाट असला तरी संपूर्ण कथा सर सर कळत जाते. वाचक तीत रंगून जातो. अंती अंतर्मुखही होतो.

‘अल्पदान महापुण्य’ ही कथा सती मैना देवीची कहाणी किंवा रथसप्तमीची कहाणी या ढगात लिहिली आहे. विषय मात्र आर. टी. ओ. च्या (रिजनल ट्रान्सपोर्ट ऑफिसरच्या) कार्यालयात सर्वसाधारणपणे चालणारी लाच, लालूचगिरी, खाबूगिरी हा आहे. परमेश्वरही आपल्या पुराणातल्या कथा खऱ्या मानल्या तर करप्टच नाही का हा प्रश्न मनाला भिडतो. चातुर्मासातील कथामधे येणाऱ्या ‘अल्पदान महापुण्य’ या उक्तीचा कथेतील वापर मोठाच मार्मिक आहे.

गुपित आणि स्वत.लाही ठाऊक नसणारा आपला अंतस्थ स्त्रीभाव नवऱ्यासमोर उघडा झाल्यावर बायकोला जन्मभर कसे नंगे, विवस्त्र झाल्यासारखे वाटते याचे भेदक दर्शन ‘नंगी’ या कथेत घडविले आहे. कथेत सारख्या दिसणाऱ्या भावाचा कच्चा दुवा असला तरी ही कथा मराठी वाङ्मयातील एक अप्रतीम कथा ठरावी या योग्यतेची आहे.

‘वाचस्पती’ या कथेची शैली मासिके, वृत्तपत्रे यातून सरसकट चालणाऱ्या ‘तुमचे प्रश्न, वैद्य अमुक अमुक ह्याचा सल्ला’ या सदरातील प्रश्नोत्तराच्या धर्तीची आहे. कथेतील वाचस्पती, नाना शारिरीक व्याधी आणि असाध्यतेवर उपाय सुचवितो; परतु व्यावहारिक जगाच्या रेटारेटीत मवाळ, दयाळू, प्रामाणिक स्वभावाचा रोग जडलेल्या (स्वाभाविक) रोग्यापुढे मात्र हात टेकतो हे खुबीदारपणे दाखविले आहे. Styles die hard हे सूत्र असे पुढे येते.

‘बाजारपेठ’ ही आणखी एक मस्त जमलेली कथा. बदलत गेलेल्या जीवनविषयक मूल्यामुळे जग बाजारू झाले आहे, सगळेच कसे विकले–विकवले जाऊ शकते हे या कथेत समर्थपणे दाखविलेले आहे. थोडया फार प्रमाणात हेच कथासूत्र मात्र अगदी वेगळयाप्रकारे ‘मरणाचा जन्म’ या सुदर कथेत उलगडवून दाखविले आहे. जिवावर बेतले की माणूस कसा झपाटयाने उडया–कोलांटया खातो, सल्ल्या–सल्ल्याना दुर्लक्षितो हे वाचल्यावर वाचक सुन्न होऊन जातो.

पात्रीकराच्या कथा माणसाच्या मनांचा असा छेद आणि वेध घेतात.

‘ओळख’ ही कथाही मनाचा असाच एक्स–रे घेणारी. या कथेत आपण आपल्यालाच किती अल्प ओळखतो हा मुद्दा रुपकात्मकरित्या आला आहे.

‘ऋतुचक्र’ मध्ये मनाने पागळचा परंतु शरीर पूर्णपणे विकसित झालेल्या मुलीची फरफट आहे. कथा तिची असूनही भोवतालच्या पात्राची नजर, त्यांचे स्वभाव विशेष, या माणसाचे इंटर–पर्सनल रिलेशन्स लेखकाने सिद्धहस्तपणे व खुबीने दाखविले आहेत.

‘किक्’ मधील साहेब शेवटी थोडया ओळीपुरताच प्रत्यक्ष येतो पण त्याचे अस्तित्व कथेच्या पहिल्याच ओळीपासून सुरू होते व शेवटपर्यंत जाणवत राहाते. या कथेचे स्वरूप Life is like that सारखे आहे.

‘वामन’ व ‘ओळख’ या कथांची बीजे सारखीच पण आविष्कार वेगवेगळे आहेत. दोन्हीही यशस्वी आहेत. आपल्यातील आपणाला आपण किती जाणतो हा प्रश्न वाचकाला या कथा वाचल्यावर बेचैन करतो.

‘चिकित्साधर्म’ ही कावेबाज जगातील भोळयाभावडया जीवाची द्रावक कथा. ‘अवमूल्यन’ कथेची भट्टी मात्र जमलेली नाही. ‘आणीबाणीतील कथा’ खरोखरीच आणीबाणीत लिहिलेली असावी. तिची शैली हरिभाऊंच्यासारखी आहे. खूप फिरवणारी व शेवटी तात्पर्य सागणारी. पाचीकरानी हे तात्पर्य प्रतिकात्मकरित्याच माडले आहे. तेव्हा उघडपणे ते शक्य नसावे म्हणून कदाचित पण कलात्मकता यातच आहे. गोष्टी उघड, सोप्या, बटबटीत करण्यात नाही. ‘मुक्काम पोस्ट चिचुद्रा’ ही पाटील मिरासदार पद्धतीची कथा हसवणारी, बेरकीपणा दाखवणारी. या सग्रहात ती वेगळया गटातली वाटते पण त्यामुळे मोनोटोनी तुटून आल्हादच जाणवावा.

वसंत चव्हाण ह्यानी काढलेले मुखपृष्ठही आगळेवेगळे आहे. नागपुरात तयार झालेले हे पुस्तक सर्वच दृष्टया देखणे झालेले आहे व डॉ. ह. भि. कुळकर्णींनी म्हटल्याप्रमाणे खरोखरीच वैचारिकता आणि उत्कटता, प्रतीकात्मक आणि वाच्यार्थ, प्रयोग आणि परंपरा याची सहजधारणा या संग्रहाने साधली आहे.

**–प्रा. चंद्रशेखर नेरले**

‘किक्’
वामन पात्रीकर
समन्वय प्रकाशन, सिमेंट रोड, नागपूर.
पृष्ठे : ९०, किंमत : १२

फिनिक्स निवड

# The New Soviet Phychic Discoveries

Henry Gris & William Dick
(Warner Books, pages 448, $2.75)

या आधी या विषयावर Psychic Discoveries Behind the Curtain हे एक महत्त्वाचे पुस्तक प्रसिद्ध झाले होते. ऑस्ट्रँडर व Schroeder या दोन स्त्रियानी ते लिहिले होते. पोलादी पडद्यामागील अतिंद्रिय शक्तीच्या शोधावर हे एक दुसरे महत्त्वाचे पुस्तक. सदर पुस्तक हे दोन पुरुषानी लिहिले आहे. स्त्रीमुक्तीवाल्याना हे एकून आनद होईल की, या दोन पुस्तकापैकी स्त्रियानी लिहिलेले पुस्तक पुष्कळ अभ्यासू व वाचनीय आहे व पुरुषानी लिहिलेले पुस्तक थोडेसे रटाळ व पुनरुक्ती करणारे आहे. तरीपण अधमधे काही नवीन माहिती या पुस्तकात आहे. या पुस्तकात रशियामध्ये मिलीटरी क्षेत्रातसुद्धा अतीद्रिय शक्तीचा वापर कला जातो असे लिहिले आहे. पोलादी पडद्यामाग काय किंवा वाबूच्या पडद्यामागे काय, सर्व गोष्टीबाबत इतका गुप्तता पाळली जाते की माओ कोणत्या ब्रॅन्डची सिगरेट ओढत होता हे जरी जगाला कळले तरी 'security' चो चक्रे भराभर फिरायला लागतील.

पॅरॉसायकॉलॉजीमध्ये श्री. सेमीयन डॅन्व्हाडॉन्व्हीच किर्लीयन हे नाव फार प्रसिद्ध आह. या रशियन किर्लीयन फोटोग्राफीचा ता जनक आहे. ही फोटोग्राफी 'Lensless' असते. प्रत्यक वस्तूचे स्वत.भोवती एक वलय असते. या वलयाचे फोटो किर्लीयन फाटोग्राफोने घेता यतात. लेसर किरणाचा आता अगणित क्षेत्रात उपयोग होतो. रशिया-मध्यसुद्धा किर्लीयन फोटोग्राफीचा उपयोग सर्व क्षत्रात अधिकाधिक वाढत आहे. श्री. किर्लीयनची या लेखकद्वयाने अडीच तास भेट घेतली होती. लेखकाना तो चॅपलीनसारखा वाटला. ज्या क्षेत्रात रशियामध्ये या किर्लीयन फोटोग्राफीचा उपयोग होत आहे, त्यातील भूगर्भशास्त्र, खगोलशास्त्र, धातुविद्या (metallurgy) व एका फौजदारी खट-ल्यात murder weapon च्या चेकिंगसाठी, माणूस खरे की खोटे बोलत आहे (lie detector सारखी) अशी थोडी उदाहरणे किर्लीयनने सांगितली. किर्लीयन फोटोग्राफीचे तत्त्व पुराणशास्त्राशीसुद्धा जुळते. कारण ज्ञानेश्वर, कृष्ण वगैरे थोर मंडळीच्या डोक्या-भोवती वलय असते हे सर्व विहीत आहेच. वैद्यकीयशास्त्रातसुद्धा किर्लीयन फोटोग्राफी रशियामध्ये वापरली गेली होती. एकदा एका मुलाला दवाखान्यात आणण्यात आले, परंतु कुणालाच त्याच्या आजाराचे निदान करता येईना. नंतर किर्लीयन फोटोग्राफीची सामग्री आणण्यात आली. त्या मुलाच्या पोटाचे फोटो घेण्यात आले. स्कार्लेट फीव्हर ज्याला होतो त्याच्यातून जशी वलये निघतात तशीच या मुलामधून निघत होती. त्याप्रमाणे त्याला औषधपाणी दिले गेले. थोड्याच दिवसानी या मुलाच्या अंगावर स्कारलेट फीव्हर मध्ये जसे ठिपके उठतात तसे ठिपके उठले.

किर्लीयन इफेक्ट हे निदान करण्याचे तंत्र रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी, चेकोस्लाव्हा-किया व पूर्व जर्मनी येथे मोठ्या प्रमाणात अवलंबिले जात आहे. एक हजार मोठे शास्त्रज्ञ व ५० हजार लॅबोरेटरी ॲसिस्टंट्स् या कामात गुतले आहेत. मानसिक रोगाचे निदान करण्यासाठीही या तंत्राचा उपयोग होत आहे. निरोगी व मनोरुग्णाच्या वलयाचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. व पेशंटच्या वलयाच्या फाईली ठेवल्या जाता.

मानसिक तणाव व थकवा हेसुद्धा किर्ली-यन सामग्रीवर नोदले जातात. भावनाची उत्कटता त्यावर मोजली जाते. प्रेमिक किती प्रमाणात प्रेम करतो की नुसती वटवट करतो हेही त्यावर समजत. म्हणज आणखी थोड्या वर्षांनी प्रेमिकाचा Sweet nothings चा बकवास बऱ्याच प्रमाणात बंद होईल. मद्यपि लोकांनासुद्धा दारू सोडण्यात त्याची मदत होते.

किर्लीयन याने अक्षरशः अगणित धंदे केले: संगीतकार, सैनिक, विक्रेता, पियानो ट्यूनर, वगैरे अनेक धंदे त्याने केले शेवटी तो सर्व प्रकारची दुरुस्ती करणारा झाला. स्वभावाने तो स्वप्नाळू होता. त्याला धड शालेय शिक्षणसुद्धा मिळाले नव्हते. तो बहुतेक गोष्टी शिकला ते वाचन करून. कादंबऱ्या वाचण्यापेक्षा तो क्रमिक पुस्तके वाचत असे. एकदा किर्लीयन एक हायफ्रीक्वेन्सी जनरेटर दुरुस्त करीत होता. त्यावेळेला त्याच्या हाताला ओरखाडे उठले होते. ओरखडलेले बरे झाले होते व तसे ते डोळ्याला दिसतही नव्हते. पण त्या हाय इन्टेन्सिटी जनरेटरच्या जवळ ते स्पष्ट दिसत होते. झाले. इथपासून किर्लीयनच्या जिज्ञासू मनाला चालना मिळाली. त्याने त्याच्या हाताचा फोटो घेतला. तो बराचसा X–Ray सारखा होता. पण नेहमीप्रमाणे त्यात हाड दिसत नव्हते. आंगठ्याभोवती काहीसे जाडजूड दिसत होते. तेच होते बोटाचे वलय.

सुरुवातीला किर्लीयनची सामग्री अगदी साधी होती. एका छोट्या खोलीत त्याने आपला पसारा माडून ठेवला होता. 'साम-ग्रीला आमची अडचण होत होती. आम्हाला सामग्रीची अडचण होत नव्हती.' असे किर्लीयन लेखकांना म्हणाला होता! प्रत्य-काचे वलय वेगवेगळे असते. बोटाच्या व आगठ्याच्या ठशासारखी कोणतीही दोन वलये सारखी नसतात. कॅन्सरचे टिश्यू या वलयामधे धूसर दिसतात तर रोगविरहीत टिश्यू रेखीव दिसतात.

या किर्लीयन फोटोग्राफीवर रशियामधे पन्नास वर्षेपर्यंत एक प्रयोग करण्यात येत आहे. तेथे काही लहान मुलाचे जन्मापासूनच वलय-फोटो दर महिन्याला घेण्यात यत आहेत आणि या मुलाचे असे फोटो ५० वर्षा-पर्यंत घेतले जाणार आहेत. या कालानतर काय निष्कर्ष निघतील ते खरे. परंतु किर्लीयन फोटोग्राफी हा लेसर किंवा एक्सरे सारखा एक मोठा शोध आहे हे नाकारता येणार नाही.

रशियाची अशी ठाम समजूत आहे की, पृथ्वीवर परग्रहावरून विकसित संस्कृती-सारखा रेडिओ-सिग्नलचा भडीमार करीत असतात. या सिग्नल्सचा अर्थ (decoding) लावण्यासाठी रशियामध्ये चोवीस तास कित्येक माणसे खपत असतात. आर्मेनीया येथे बायराकान वेधशाळेत हे काम सतत चालू असते. बायराकान वेधशाळेत आत्ता-

पर्यंत फारच कमी परदेशी पत्रकारांना प्रवेश दिला गेला आहे. या लेखकद्वयानी वशीला लावून तेथे प्रवेश मिळवला. हे दोन, लेखक असे म्हणतात की, विश्वातील इतर विकसित संस्कृतीनी पाठवलेल्या संकेताचे अर्थ लावण्याच्या कामाला व विश्वातले इतर जीव शोधण्याला रशियाने सर्वप्रथम प्राधान्य दिले आहे. निव्वळ संख्या व विस्ताराच्या दृष्टीने जरी विचार केला तरी एक गोष्ट निर्विवाद आहे ती ही की, विश्वात इतर जीव असणे हा एक अपवाद नसून नियमच असेल. बायकारानचे प्रोफेसर मीरझोयन तर असे म्हणतात की विश्वात इतर जीव आहेत की नाही तो प्रश्नच नाही. प्रश्न हा आहे की, त्याच्याशी सुसवाद कसा साधायचा. या दोन लेखकांना प्रयोगशाळेच्या आत जाण्याविषयी परवाने होते तरी त्यांना जागोजागी रशियन हत्यारी पोलीसानी अडवले. याचे कारण एकच असू शकेल. कसलाही मोठा प्रकल्प असला तरी तो शेवटी defence national interest याच्याशी निगडीत असतो. उदाहरणार्थ रेडिओ सिग्नल्सचा अर्थ लावण्यासाठी कित्येक प्रकारची सामग्री अशी असू शकेल की, त्याचा मिलीटरीनासुद्धा उपयोग होत असेल. मानवाच्या हितासाठी व निव्वळ संशोधनासाठी (pure research) मोठमोठे प्रकल्प रशियात, अमेरिकेत व इतर देशात असतात हे सर्व ठीक. परंतु अशी कितीतरी क्षेत्रे असतील की तेथे duplicate research होत असेल. असे झाले की वेळ व पैसा यांचा प्रचंड अपव्यय आलाच. काही क्षेत्रात अर्थात् हा duplicate research शक्य तेवढा कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण जिथे जिथे मिलिटरी, देशाच्या हितासाठी वगैरे प्रकारचा लवलेशही येतो तिथे मग द्विस्तरीय संशोधन दसपटीने वाढले तरी चालते. कधी कधी हे द्विस्तरीय संशोधन वेगवेगळ्या देशात तर होतेच, पण एकाच देशाच्या वेगवेगळ्या डिपार्टमेंटमधेही होऊ शकते.

पृथ्वीवरच्या रेडिओ लहरी गेल्या तीस वर्षात दशलक्षपटीने वाढले आहेत आणि म्हणूनच इतर विकसित संस्कृतीना आपले 'present' म्हणून उंचावलेले index finger ऐकले असेल असे बायराकान वेधशाळेचे प्रोफेसर मीरझोयन म्हणाले. 'Close Encounters of The Third Kind होईल,तेव्हा अर्थात् भाषेची अडचण विकसित विज्ञानाने दूर होईल.

विश्वाचा विस्तार व व्यापाचा आढावा तर राहोच पण त्याच्या कल्पनेचा आपण विचार जरी केला तरीसुद्धा मन सुन्न व थक्क होते. मीरझोयन असे म्हणतात की आपल्या अगदी जवळची विकसित संस्कृती कमीत कमी शंभर प्रकाशवर्षे दूर आहे. बाकी सर्व जवळच्या ताऱ्यावर जीवन निर्वंश झाले आहे. एकाच ग्रहावर जीवन संपूर्ण निर्वंश होणे, परत त्यावर जीवनाचे बीज पेरले जाणे व ते बीज उत्क्रांत होत जाणे असाही कदाचित सृष्टीक्रम असेल. आपल्याच आकाशगंगेमध्ये १०० बिलीयन्स तारे आहेत. यात सजीव सृष्टी असलेल्या दहा हजार पृथ्व्या सहज असतील असा शास्त्रज्ञाच्या कयास आहे आणि आपल्या आकाशगंगेसारख्या कित्येक लाख आकाशगंगा विश्वात आहेत.

हे पुस्तक तीन भागात विभागलेले आहे. त्यातील एक भागच परग्रहावरील जीवन या विषयाला वाहिलेला आहे. दुसरा एक भाग विज्ञानाच्या दृष्टिकोनातून अतींद्रिय शक्तीवर शोध या विषयावर आहे. आणखीन पुस्तकाचा एक तृतियांश भाग ज्या व्यक्तींना अतींद्रियशक्ती अवगत आहे त्यांच्यावर आहे. एकूण पुस्तक वाचावयास अगदी सोपे व सरळ आहे.

—जे एन्. पोंडा


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

| | रुपये |
|---|---|
| १. पु. ल एक साठवण-संपादक–जयवंत दळवी | २५/– |
| २. लोकनायक जयप्रकाश–(चरित्र व कार्य-बा. न. राजहंस) | २५/– |
| ३. झूल–(कादंबरी)–भालचंद्र नेमाडे | २५/– |
| ४. काळा हिटलर–(इदी अमीनच्या उदयास्ताची कहाणी) आनंद हर्डीकर | १५/– |
| ५. छेद–(लेख)–अनिल अवचट | १०/– |
| ६. कांचन–(कादंबरी)–बाबा कदम | ४०/– |
| ७. विनोदी महाराष्ट्र–(विनोदी कथा)–रमेश मंत्री | १६/– |

ENGLISH

1. Memories of Another Day–Harold Robins–(Bestseller novel) 20/–
2. The Third World War–General Sir John Hackett–(Bestseller–War, novel)
3. The Shakeout–(Bestseller nover)–Ken Follett

वाचनालयाच्या विस्तारासाठी भव्य सवलत योजना !
सर्व वर्गण्यांवर ३०% सूट ! (फक्त नवीन वर्गणीदारांकरिता)
सूट मर्यादित काळापर्यंतच.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

# जनसत्ता – सत्तांतर आणि नंतर : पृष्ठ ३ वरून

यांना आलेलं अपयश, मोरारजींनी अनेक बाबतीत घेतलेली हट-वादी भूमिका, हेमवतीनंदन बहुगुणांचे कुटिल डावपेच, भूतपूर्व जन-संघाच्या ध्येय-धोरणाबद्दल इतर घटकामध्ये असलेले गैरसमज दूर करून विश्वास निर्माण करण्यात जनसंघ नेत्याना आलेलं अपयश अशा अनेक बाबीमुळे जनता पक्ष खिळखिळा होत राहिला.

दुर्दैवानं, जनता पक्ष खऱ्या अर्थानं कधीच एकसंध झाला नाही. घटक पक्षामध्ये आणि नेत्यामध्ये असलेला अविश्वास आणि मतभेद दूर झाल्याचा फक्त देखावाच राहिला. जनसंघ–समाजवादी, जन-संघ–लोकदल, लोकदल–संघटना कॉंग्रेस असे मतभेद मिटले नाहीत. प्रत्येकानं आपला सवता सुभा चालूच ठेवला. एकट्या जनसंघावर दुहेरी निष्ठेचा आरोप करण्यात अर्थ नव्हता. बाबूजींच्या लोकशाही कॉंग्रेसपासून जॉर्जच्या समाजवादी पक्षापर्यंत कुठलाच पक्ष खऱ्या अर्थानं विसर्जित किंवा विलीन झाला नाही. जनता पक्ष ही एक मोठी सहकारी गृहरचना संस्था झाली होती. प्रत्येकानं आपापला ओनरशिप फ्लॅट त्यात जपून ठेवलाच होता. त्यामुळेच स्वतःचं घर जपत राहताना मुख्य इमारतीची काळजी कुणी केलीच नाही. जनता पक्षाचं विभाजन व्हायला ही वृत्ती आणि परिस्थितीच कारणीभूत ठरली. जयप्रकाशजींसह कुणीच याला आवर घालू शकलं नाही.

## जयप्रकाशांची अखेर

प्रकृती साथ देत नसताना, जीवनात स्वत.ला कसलीही अभिलाषा राहिलेली नसताना प्राणपणानं प्रयत्न करून जयप्रकाशजींनी विरोध-कांना एकत्र आणलं होतं. पण सत्तेवर येईपर्यंत जनता पक्षातल्या सर्वांनाच हवे असलेले जयप्रकाशजी नंतर मात्र हळूहळू बाजूला सारले गेले. प्रत्यक्षात तसं कुणीच म्हटलं नाही. पण कृतीनं सर्वांनी तेच केलं. जयप्रकाशजींची सल्ला–मसलत किंवा कोणत्याही प्रश्नात त्यांची मध्यस्थी ही एक प्रथेसारखी औपचारिक बाब होऊन बसली. स्वार्थ साधण्यासाठी वापरायचं एक चलनी नाणं म्हणूनच त्यांच्या नावाचा वापर सर्वजण करीत राहिले. प्रत्यक्षात जयप्रकाशजींच्या शब्दाला नंतर फारशी किंमत उरली नाही. सर्वस्वानिशी झगडून आपण उभारलेला बुरूज ढासळताना त्यांना काय यातना झाल्या असतील, ते त्यांनाच ठाऊक ! शारीरिक व्याधींनी ते खचले नव्हते, पण या अपयशानं ते खचले असावेत. जनता पक्षाचा पूर्ण विध्वंस झाल्याचं पहायला ते हयात नव्हते. पण स्वतःच्या या स्वप्नाचा चक्काचूर होणार, हे त्या महान नेत्यानं मनोमन आधीच जाणलं असेल. पण ते बोलले नाहीत. जनता पक्षाच्या यशात मोठा वाटा उचलणारे असेच दुसरे वयोवृद्ध विचारवंत नेते आचार्य कृपलानी यानी तर एकदा स्पष्टपणे बोलून दाखवलं, "आमचं हल्ली कुणीच ऐकत नाही. जो तो आपल्याला हवं ते करण्यात मग्न आहे."

जयप्रकाशजी–आचार्य कृपलानी यांच्यासारख्या नेत्याना येणारं हे नैराश्यही जनता–नेत्याना सलत नव्हतं. आपल्याच अंतर्गत झगड्यां-मध्ये आणि सत्तेच्या राजकारणात ते मश्गुल होते. पक्ष विभा-जनाच्या बिंदूला येऊन ठेपला होता. फूट अटळ होती. या सर्व प्रकारामुळे जनताही अधिकाधिक विटत चालली होती जनता पक्षापासून जनता दुरावायला लागली होती. पण नेत्याना याचं भान उरलं नव्हतं. ते आपल्याच भ्रमात राहिले आणि जनता मात्र भ्रम-निरास होऊन वेगळ्या दिशेनं प्रवास करायला लागली.

'ही खिळ्या – भोपळ्यांची मोट फार काळ एकत्र नांदणार नाही,' हे इंदिरा गांधींचं भाकित खरं ठरत चाललं होतं. त्याना ते हवंच होतं. जणू काही त्याना परत सत्तेवर आणण्याच्या पूर्व-तयारीसाठीच जनता पक्ष एकेक पाऊल टाकत होता. त्यातून जनता पक्षापासून दुरावत चाललेली जनता इंदिराजींकडे वळायला लागली होती. इंदिराजीही हत्तीदंती मनोऱ्यात न राहता वेळप्रसंगी हत्ती-वरूनही जनतेच्या समीप जाण्याचा प्रयत्न सतत करीत होत्या.

## इंदिरा लाट – असंतोषाला वाट

जनता पक्षापासून जनता दूर जायला लागण्यामागे आणखीही काही कारणं होती. पक्ष सत्तेवर आल्यापासून 'आणीबाणीतले अत्याचार, विचार स्वातंत्र्याची गळचेपी, वृत्तपत्रस्वातंत्र्याची मुस्कटदाबी, इंदिरा गांधींचा एकाधिकारशाही कारभार' याबद्दलच नेते बोलत राहिले. जनता पक्षानं नागरी हक्क आणि वृत्तपत्र स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित केलं, आणीबाणीतले अनेक अत्याचार दूर केले, ही कामगिरी निश्चित मोठी होती. पण प्रामुख्यानं वैचारिक पातळीवरचंच हे कार्य होतं. शिवाय कुठल्याही निवडणुकीत एवढा एकच डांगोरा पिटत राहण्यात अर्थ नव्हता. पण नेते तेच सांगत राहिले. पक्षानं दुसरं काहीच कार्य केलं नाही, असा सोयीस्कर समज इंदिरा गांधी त्यातून निर्माण करू शकल्या.

परराष्ट्र-संबंधात सुधारणा किंवा अलिप्त राष्ट्र चळवळीत भार-ताची अधिक उजळ प्रतिमा निर्माण करण्याचं कार्य जनता सरकारनं केलं. पण हे सर्व कार्य समाजातल्या बौद्धिक पातळीवरच्या वर्गा-पुरतंच मर्यादित होतं. तळापर्यंत पोचायला ते निरुपयोगी होतं. सामान्य माणसाला दैनंदिन जीवनातले प्रश्न फार महत्त्वाचे असतात. विचार स्वातंत्र्यानं त्याची भूक भागत नाही. त्या सामान्य माणसा-साठी जनता पक्षानं काय केलं ? खरं म्हणजे किंमती स्थिर राखणं, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई दूर करणं असं कार्यही जनता सरकारनं केलं. पण ते जनतेपुढे प्रभावीपणानं मांडण्याचं कार्य कुणी केलंच नाही. अंतर्गत झगड्यांचंच चित्र जनतेपुढे जास्त येत राहिलं. त्यातच कायदा नि सुव्यवस्था राखण्यात सरकार फारसं यशस्वी झालं नाही. त्यामुळे जनतेला अपेक्षाभंग जाणवू लागला. जनता पक्षाच्या कार्याचं मोल शहरी भागापुरतंच मर्यादित राहिलं आणि बहुसंख्य समाज वेगळं आशास्थान शोधू लागला. हा असंतोष ओळखून त्या लाटेला आपल्या बाजूला वळविण्याची कुशलता फक्त इंदिरा गांधीच दाखवू शकल्या. त्यातच त्यांचं यश सामावलेलं आहे.

जनता पक्ष सत्तेवर आल्यापासूनच इंदिराजी एकीकडे जनता पक्षाविरुद्ध असंतोष आणि दुसरीकडे स्वत.बद्दल सहानुभूती निर्माण

करीत होत्या. जनता पक्ष सरकारनं त्याच्याविरुद्ध शहा आयोगासह अनेक आयोग नेमले होते. या आयोगापुढे आपल्यावर असलेल्या आरोपाचा वापरही त्या स्वत चं बळ वाढविण्यासाठी कोशल्यानं करून घेत होत्या. चरणसिंग गृहमंत्री असताना त्याना झालेली अटक आणि न्यायालयानं केलेली त्याची मुक्तता जनता पक्षाचं हसं करायला आणि स्वत.चं बळ वाढवायला इंदिराजीना उपयोगी ठरली होती जनता पक्ष सत्तेवर आल्यावर कॉंग्रेस फुटली तेव्हा खऱ्या अर्थानं एकाकी पडल्या होत्या. पण स्वत.च्या अचाट हिंमतीवर, कुशल राजकारणपटुत्वावर त्या एकाकी लढा देत राहिल्या. यशवंतराव चव्हाणासारख्या विरोधी नेत्याचे साहसहीन, दुर्बल नेतृत्व आणि जनता पक्षातले अंतर्गत झगडे त्यांच्या पथ्यावर पडले आणि अल्पावधीतच ससदेत नसूनही इंदिराजीच जनता पक्षाचा खरा विरोधी पक्ष बनल्या. प्रारंभीच्या काळात जनता पक्ष सरकार त्याना शह देण्यास यशस्वी झालं होतं. पण अटक–प्रकरणानंतर त्याच्या यशाचं वारू जनता पक्ष कधीच रोखू शकला नाही.

कॉंग्रेसच्या दुर्बल नेतृत्वामुळे आणि इदिराजीच्या प्रभावामुळे हळूहळू कॉंग्रेसला उतरती कळा लागली. यशवंतरावाचं विरोधी पक्षनेतेपद गेल आणि ते बाईंच्या कॉंग्रेस (आय) ला मिळालं. बाई कर्नाटकातल्या चिकमगळूर लोकसभा मतदार संघातून पोटनिवडणुकीत प्रचंड बहुमतानं निवडून आल्या. त्याच्याविरुद्ध हक्कभंगाच्या एका प्रकरणात कारवाई करून जनता पक्षानं त्याचं सभासदत्व रद्द केल. असे अनेक चढ-उतार होत गेले तरी त्या डगमगल्या नाहीत. त्याचं धैर्य आणि आत्मविश्वास असामान्य म्हटला पाहिजे. त्या बळावरच त्या ससदेबाहेरून सरकारला आव्हान देत राहिल्या.

## धूर्त नेतृत्वाचा झंझावात

अखेर जनता पक्षाचा डोलारा कोसळला. चरणसिंग, राज नारायण, मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस, बहुगुणा मंडळीचा गट जनता पक्षाबाहेर पडला. जनता पक्ष सर्वात मोठा पक्ष असूनही निष्प्रभ ठरला. बाबुजीना पंतप्रधान करायला जनता पक्षानं मान्यता दिली असती तर जॉर्ज वगैरे मंडळी पाठिंबा द्यायला तयार होती पण मोरारजीभाईंनी राजीनामा द्यायला नकार दिला. ' विरोधी पक्षानं माडलेल्या अविश्वास ठरावावर मात करू या, मगच मी राजीनामा देईन,' अशी भूमिका त्यानी घेतली पण अखेर त्याना मत्रिमंडळाचा राजीनामा द्यावा लागला. बाईंनी हा मोका साधून चरणसिंगाच्या महत्त्वाकाक्षेला फुलवल. त्याना बाहेरून पाठिंबा दिला. कॉंग्रेस आणि चरणसिंगाच लोकदल याची युती झाली. त्याचं आघाडीच सरकार सत्तेवर आल. बाईंचा पक्ष मंत्रिमडळात सहभागी नव्हता, पण त्याच्या पाठिंब्यावरच सरकार अवलंबून होतं. बाईंनी मोका साधून तेही गडगडवून टाकलं. चरणसिग आणि मंडळीची तत्त्वनिष्ठा जगाच्या नजरेला आणून दिली, त्याचा कार्यभाग साधला होता.

चरणसिंगाच सरकार गडगडल्यावर राष्ट्रपती नीलम सजीव रेड्डी यानी सर्वांत मोठा पक्ष म्हणून जनता पक्षाला सरकार बनवायची सधी द्यायला हवी होती. एव्हाना मोरारजीभाईंनी नेतेपदाचा राजीनामा देऊन जनता पक्षाचे नेतेपद बाबूजीकडे सापवल होत. पण राष्ट्रपतीनी बाबूजोना सरकार बनवू दिलं नाही. चरणसिग–सरकार सत्तेवर येताना पक्षांतराला ऊत आला होता. बाबूजीना सरकार बनवू देण्यानं पुन्हा पक्षातराला ऊन येईल, अशी राष्ट्रपतीची भूमिका असल्याचं सागितलं जात, पण ती तेवढीच असावी, असं वाटत नाही. पूर्वीचे काही राग-लोभही महत्त्वाचे ठरले आणि लोकसभा-विसर्जनाचा चरणसिंग–सरकारचा सल्ला मानून राष्ट्रपतीनी मध्यावधी निवडणुका जाहीर केल्या

ऑगस्ट १९७९ मध्ये लोकसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतरचं चरणसिंगाचं काळजीवाहू सरकार हे देशाला सरकार आहे, म्हणण्यापुरतंच होतं. त्यान गोंधळ वाढवला, पण सर्व प्रशासन थाबवलं. सरकारहीन अवस्थेतच देशाचा कारभार नेहमीच्या चाकोरीनं चालला होता. विशेष दखल घेण्यासारख हे सरकार नव्हतं. त्याच्या कारकीर्दीत भाव वाढले, जीवनावश्यक वस्तूची टंचाई वाढली, नियोजनाचा खेळ झाला, दंगली वाढल्या, सीमेवर तणाव वाढले. केंद्रात दुर्बल सरकार असलं की कशा यातना भोगाव्या लागतात, हे जनतेला जाणवू लागल आणि या पार्श्वभूमीवरच बाईंनी ' केंद्रात स्थिर नि समर्थ सरकार ' आवश्यक असल्याचा पुकारा केला. सर्व प्रश्नावर हा एकच तोडगा असल्याचं त्या वारंवार सागू लागल्या आणि त्यालाच त्यानी पुस्ती जोडली, ' Vote for those who can govern.' तीन वर्षांच्या जनता, लोकदल-कॉंग्रेस राजवटीला उबगलेल्या जनतेला हे आवाहन भिडलं असावं.

यावरोबरच अल्पसंख्याकाच्या मनात बाईंनी निर्माण केलेला विश्वास, इंदिराजीचं समर्थ नेतृत्वच देशाचे आर्थिक-सामाजिक सोडवू शकेल अशी भावना जनसामान्यात निर्माण करण्यात त्याना आलेलं यश, बाईचं प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि अखिल भारतीय पातळीवर असलेला त्यांचा प्रभाव या त्यांच्या जमेच्या बाजू होत्या. निवडणुका जाहीर झाल्यावर कॉंग्रेसचे देशभरचे बहुसंख्य नेते-कार्यकर्ते कॉंग्रेस (आय) ला येऊन मिळाले होते. त्यामुळे कार्यकर्त्यांचं बळ भरपूर होतं. पैशालाही कमतरता नव्हती. पण आंध्र प्रदेश वगळता कुठेही त्याच्या हातात सत्ता नव्हती. प्रचड साथ दिलेला देवराज अरस याच्यासारखा नेता विरोधात उभा ठाकला होता. बहुसंख्य वृत्तपत्रं विरुद्ध होती. पक्षाकडे दुसरा एकही प्रभावी नेता नव्हता. म्हणजेच सगळा एकखांबी तंबू होता. अशा अवस्थेत बाईंनी अथकपणे देशभर झंझावाती प्रचार केला. दुसरा कुठलाही पक्ष किंवा नेता त्याच्या या झपाट्याशी स्पर्धा करू शकला नाही. जनतेनं बाईंना भरघोस कौल दिला आणि देशावरची आपली पकड सिद्ध करून बाई पुन्हा दिल्लीच्या तख्तावर विराजमान झाल्या.

## निवडणूक निकालाचा अन्वयार्थ

जनतेनं मतपेटीतून दिलेला हा लोकशाही कौल आहे. तो मान्य केलाच पाहिजे. जनतेने जनता पक्षाच्या अतर्गत झगड्याबद्दल त्याना शासन घडवलं आहे: ' ही शिक्षा फार मोठी आहे,' असं नानासाहेब गोऱ्यासारख्या नेत्याना वाटतं आणि ते बरोबरही आहे. पण अतर्गत झगड्याची केवढी किंमत मोजावी लागेल, याचा विचार नेत्यानी त्यावेळी केला नाही त्याचं हे प्रायश्चित्त आहे. विरोधी पक्ष चळवळीचं एक मोठं प्रशिक्षणही त्यात सामावलेलं आहे पण विरोधकानी ते स्वीकारलं तरच त्याना काहीतरी तरणोपाय आहे.

१९७७ च्या निवडणुकीपासून मतदाराला आपली ताकद कळली आहे. झटपट परिणामाच्या अपेक्षेनं तो काहीसा अधीरही बनला आहे. याची प्रचिती सातव्या लोकसभेच्या निवडणुकीनं दिली आहे. त्यामुळे यापुढे मतदार पूर्वीप्रमाणे एखाद्या पक्षाशी किंवा व्यक्तीशी आधळी बांधिलकी ठेवणार नाही, असं मानायला हरकत नाही.

या निवडणुकीनं बरच काही घडवलं आहे. काही स्वागतार्ह परिणाम साधले आहेत, तर काही चिंताजनक प्रश्न निर्माण केले आहेत. संमिश्र पण लोकशाहीच्या दृष्टीनं महत्त्वाचे असे हे परिणाम, निष्कर्ष दुर्लक्षून चालणार नाही.

गेल्या काही निवडणुकात उत्तर आणि दक्षिण अशी देशाची विभागणी निकालात दिसून यायची. ही विभागणी असणं एकूण कारभाराच्या आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनं फारसं चागलं नव्हतं. १९७७ च्या निवडणुकीतही जनता पक्षाला उत्तर भारतात भरघोस यश मिळालं होतं, पण दक्षिण भारतात मात्र फारसं स्थान लाभलं नव्हतं. यावेळच्या निवडणुकीत मात्र काँग्रेस (आय) ला पश्चिम बंगाल आणि काही प्रमाणात केरळ वगळता सर्व राज्यांमध्ये सारखाच कौल मिळाला आहे. एकूण कारभाराच्या आणि एकात्मतेच्या दृष्टीनं विभागणी टळणं उपयुक्तच ठरणार आहे.

## भारतीय मतदाराचे मानसशास्त्र

पण त्यावरोबरच या कौलातूनच दुसरा एक धोकाही निर्माण झाला आहे. काँग्रेस (आय)ला मिळालेलं बहुमत जवळजवळ दोन तृतियाश इतकं आहे. एकूण ५२५ जागासाठी निवडणूक झाली. त्यातल्या ३५१ जागा काँग्रेस (आय)ला मिळाल्या. (दोन तृतियाश बहुमतासाठी १ जागा कमी पडली.) स्थिर राजवटीच्या आणि केंद्रात समर्थ सरकार असण्याच्या दृष्टीनं हे बहुमत स्वागतार्ह आहे. पण या स्थिरतेतच प्रतिसादहीन, ताठर राजवटीची बीजं सामावलेली असण्याचा धोका प्रचड बहुमतामुळे निर्माण झालेला आहे. त्यातूनच एकाधिकारशाहीचा धोका संभवतो. इदिरा गांधीचं व्यक्तिमत्व आणि त्याच्याभोवतीचे साथीदार लक्षात घेता हा धोका अधिकच जाणवतो. म्हणूनच हे बहुमत असमतोलकारक आहे, नको तितक्या जास्त प्रमाणात आहे, असं म्हणाव लागतं. घटनादुरुस्तीसाठी आता इंदिरा गाधीना इतर कोणावरही अवलबून राहावं लागणार नाही, हेही लक्षात घ्यायला हवं. बाईंना लाभलेल हे बहुमत दुधारी आहे. बाई मनात आणतील तसा त्याचा वापर करू शकतील. म्हणजेच त्याचा वापर कसा होतो यावरच ते चागलं की वाईट हे ठरेल आणि तो वापर तर सर्वस्वी बाईंच्या, त्याचे सुपुत्र संजय आणि त्याचे साथीदार याच्याच मनावर अवलंबून आहे.

बाईंना हे बहुमत देताना मतदाराचं वर्तन बदललेलं आहे. अनेक प्रातात उमेदवार कोण आहे, हे न पाहता काँग्रेस (आय)ला मतदान झालेलं आहे. काही परदेशामध्ये विविध पक्ष उमेदवाराच्या याद्या जाहीर करतात आणि मतदार एखाद-दुसऱ्या फरकानं पक्षाच्या या याद्याना मत देतो, तसं काहीसं यादीपद्धतीनं मतदान झालं आहे. अर्थात इथे पक्षापेक्षा इंदिरा गाधी या व्यक्तीलाच ही मतं आहेत. म्हणजेच ३५१ मतदारसंघामधून इदिरा गाधीच निवडून आल्यासारख्या आहेत (ही लोकप्रियताही सामान्य नाही.)

हे मतदान करताना जनतेनं फुटिरांना मोठ्या प्रमाणावर नाकारलं आहे. मधू लिमये, श्रीमती मृणाल गोरे, राजनारायण असे अनेक फुटीर, पक्षफोडे पराभूत झाले आहेत. त्यांचं व्यक्तिमत्व, कार्य, तात्त्विक भूमिका आदीचा विचार मतदारांनी केलेला दिसत नाही. पक्षातराला आळा बसण्याच्या दृष्टीनं मतदारानी शिकवलेला हा धडा काही प्रमाणात उपयोगी पडला, तरी बरंच साध्य होईल.

फुटिराप्रमाणेच अपक्ष आणि छोटे छोटे प्रादेशिक पक्षही मतदारानी नाकारले आहेत. यावेळी जवळजवळ २८०० अपक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. त्यातले फक्त तीनच यशस्वी ठरून निवडून आले आहेत. इतराना पराभव पत्करावा लागला आहे. निकोप लोकशाहीसाठी तत्त्वनिष्ठ अपक्ष सदस्य वाढले पाहिजेत, असं प्रतिपादन करणारे नामवंत माजी अपक्ष खासदार पु. ग. मावळंकर याच्यासारख्यानाही पराभव पत्करावा लागला आहे. मावळंकरासारखा एखादा अपवाद सोडला तर अपक्षाना मतदारानी ठोकरल्याच स्वागतच केल पाहिजे. कारण राजकीय सौदेबाजीत अनेकदा अपक्ष आघाडीवर दिसतात. कोणतीही तात्त्विक भूमिका किंवा धोरण नसणारे हे बहुसख्य उमेदवार असतात. त्याना नाकारण्यान राजकीय सौदेबाजी थोडी तरी कमी होईल. अर्थात यावेळी काँग्रेस (आय)ला प्रचंड बहुमत मिळाल्यामुळे इतरांचा पाठिंबा मिळविण्यासाठी सौदेबाजी करण्याची गरज नाही आणि इतर पक्षाना नगण्य जागा मिळाल्यामुळे अपक्षाची साथ लाभूनही काही उपयोग होणार नसल्यामुळे त्यानाही सौदेबाजीची आवश्यकता नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे यावेळी अपक्ष निष्प्रभ असले तरी मतदाराचा हा कल असाच राहणं उपयुक्त ठरेल.

प्रादेशिक पक्षाच्या बाबतीतही मतदारानी अशीच स्वागतार्ह भूमिका घेतली आहे. अकाली दल, अण्णा द्र. मु. क., समातर काँग्रेस, शे. का. पक्ष, शिवसेना, सोशॅलिस्ट, रिपब्लिकन आर्मी अशासारख्या अनेक प्रादेशिक पक्षांचा या निवडणुकीत धुव्वा उडाला आहे. फक्त द्र. मु. क. ला, तेही काँग्रेस (आय)च्या साथीनं यश मिळालं आहे. प्रादेशिक पक्ष ही बऱ्याच वेळा राजकीय बेटं ठरतात आणि सकुचित भूमिकासाठी व्यापक राजकीय प्रवाहात अडथळे निर्माण करतात. त्यामुळे असे पक्ष सपुष्टात येणं राष्ट्रीय प्रवाहाच्या दृष्टीनं आवश्यक आहे. सूक्ष्म दृष्टीन पाहता असे छोटे पक्ष या विभाजनवादी प्रवृत्तीच आहेत. म्हणून राष्ट्रीय एकात्मतेला त्या मारक आहेत. त्याचं एखाद्या विशिष्ट प्रदेशात, वर्गात किंवा जातीत असलेलं स्थान सपुष्टात येणं या एकात्मतेच्या दृष्टीनं उपकारकच म्हणाव लागेल.

## संघटनाशिवाय पर्याय नाही

असे प्रादेशिक पक्ष अयशस्वी ठरून फक्त राष्ट्रीय पक्षच आता मुख्य प्रवाहात उरले आहेत. (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि उजवा कम्युनिस्ट पक्ष हेही 'काही प्रदेशापुरतेच मर्यादित' या अर्थानं प्रादेशिक पक्षासारखे झाले असले तरी प्रत्यक्षात त्याची भूमिका प्रादेशिक पक्षांची नाही. म्हणून त्याची गणना राष्ट्रीय पक्षातच करायला हवी.) मुख्य प्रवाहात उरलेल्या राष्ट्रीय पक्षांचं बळ किती आहे, हा प्रश्न आहे; पण तरीही त्याना निदान अखिल भारतीय

पातळीवर काही अनुयायी आहेत, त्यांची ध्येय-धोरणं राष्ट्रीय भूमिकेतून आहेत, हेही महत्त्वाचं आहे.

या राष्ट्रीय पक्षाना या निवडणुकीनं पूर्वीचाच धडा पुन्हा एकदा शिकवला आहे. 'सर्व विरोधी पक्ष मतभेद बाजूला सारून एकत्र आले तरच कॉंग्रेसला हरवू शकतील,' असं डॉ. राम मनोहर लोहिया किंवा जयप्रकाश नारायण सातत्यानं सांगत होते ते किती सत्य आहे, याचा पडताळा विरोधी पक्षाना या निवडणुकीनं पुन्हा एकदा दिला आहे. (फक्त यावेळी कॉंग्रेसची कॉंग्रेस (आय) झाली आहे, एवढच ).

विरोधी पक्ष एकत्र आले बहुमत मिळवू शकतात, हे, जनता पक्षाच्या रूपानं १९७७ साली सर्वांनी अनुभवलं होतंच. (अर्थात् त्यावेळी यश मिळायला इतरही काही कारणं होती.) हे पक्ष स्वतंत्रपणे उभे राहिले की आपोआपच मतांची विभागणी होते आणि अल्प मताच्या आधारानं कॉंग्रेसला बहुमत मिळतं, हा अनुभव पूर्वीपासून या पक्षानी घेतला आहे यावेळीही आकडेवारीवर थोडीशी नजर टाकली तर असंच दिसून येतं. यावेळी १९ कोटी ६० लाख लोकानी मतदान केलं. एकूण मतदारांच्या ५५.४९ टक्के हे मतदान होतं. झालेल्या एकूण मतदानाच्या ४२.५६ टक्के मतंच कॉंग्रेस (आय)ला मिळालेली आहेत. गेल्या निवडणुकीत अविभक्त कॉंग्रेसला ३४.३५ टक्के मतं पडली होती. म्हणजे यावेळी त्याची मतं सुमारे ९ टक्क्यानी वाढली आहेत. गेल्या वेळी अविभक्त कॉंग्रेसला ५४२ पैकी १५३ जागा मिळाल्या होत्या. यावेळी कॉंग्रेस (आय) ला ५२५ पैकी ३५१ जागा मिळाल्या आहेत. म्हणजे ४२.५६ टक्के मतं आणि सुमारे ६६ टक्के जागा त्याना मिळाल्या. याउलट इतर पक्षाना जवळजवळ ५८ टक्के मतं पडूनही जागा मात्र ३४ टक्के मिळाल्या आहेत. याचाच अर्थ आपापसातील मत विभागणीमुळे स्पर्धेत कॉंग्रेस (आय)ची मतं सर्वाधिक ठरून त्याना सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. विरोधी पक्षानी मतभेद विसरून ही वस्तुस्थिती स्वीकारली नाही आणि ते एकत्र आले नाहीत तर तो आत्मघाताचाच प्रकार ठरेल. विरोधी मंडळी हे ओळखून काही पावलं टाकणार नसतील तर अजूनही त्याना पुरेसा शहाणपणा शिकता आलेला नाही, असंच म्हणावं लागेल.

## भावी पंतप्रधान – अटलबिहारी ?

अस एकत्र येणं ही देखील भारतातल्यासारख्या विशिष्ट परिस्थितीत विरोधकाची लोकशाहीबाबतची एक जबाबदारी आहे. तोडानं लोकशाहीच्या गप्पा मारायच्या आणि प्रत्यक्षात आपापसात भाडत राहून एकाधिकारशाहीला पोषक वातावरण निर्माण व्हायला, अप्रत्यक्षपणे का असेना पण, हातभार लावायचा हा प्रकार विरोधकांनी थांबवायला हवा. त्यांच्या या लाथाळ्यामुळेच आज लोकसभेत प्रभावी विरोधी पक्ष उरलेला नाही. मान्यताप्राप्त विरोधी पक्ष होण्यासाठी लागणाऱ्या एकदशांश जागा एकही पक्ष मिळवू शकलेला नाही, यावरून या पक्षानी स्वत चं बळ ओळखायला हवं. गेल्या वेळी कॉंग्रेसला १५३ जागा मिळाल्या होत्या. या वेळी सर्व विरोधी पक्षाना मिळून १७४ जागा मिळाल्या आहेत. कॉंग्रेस (आय)ला लाभलेल्या प्रचंड बहुमतावर अंकुश ठेवायला प्रभावी विरोधी गट लोकसभेत उरलेला नाही. १९७७ ची निवडणूक वगळता पूर्वीपासून आजतागायत भारतात विरोधी पक्ष जोमानं अस्तित्वातच आलेला नाही. यावेळीही तेच घडलं आहे. १९७७ च्या निवडणुकीनं विरोधी पक्ष प्रभावी होण्याची एक चागली शक्यता निर्माण केली होती; पण या निवडणुकीनं या शक्यतेला तडा देऊन लोकशाही राजकारणाची मोठी हानी केली आहे. दुर्दैवानं, आज या पक्षाच्या संघटनासाठी जयप्रकाशासारखा एकही नेता उरलेला नाही. त्यातल्या त्यात विचारच करायचा झाला तर प्रभावी विरोधी पक्ष संघटित करू शकेल, असा अटलबिहारीशिवाय एकही नेता दिसत नाही. या दृष्टीनं अटलबिहारीवर फार मोठी जबाबदारी आहे, असं म्हणावं लागेल.

## वृत्तपत्रे, विचारवंत आणि जनमत

सुशिक्षित मडळीचा निरूत्साहही विरोधी पक्षांच्या बळकटीला तडा द्यायला कारणीभूत आहे. यावेळी ग्रामीण भागात चागलं मतदान झालं. पण शहरी भागात मात्र अपेक्षेइतकं मतदान झालं नाही. एकूण जवळजवळ १२ कोटी ४० लाख लोकानी मतदान केलं नाही. एवढा मोठा वर्ग मतदानाबाबत उदासीन राहणं लोकशाहीच्या दृष्टीनं निश्चितच पोषक नाही. राजकीय पक्षानी आणि लोकशाहीवादी सेवासंस्थानीही ही उदासीनता घालविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत कारण लवकरच जनतेला पुन्हा एकदा मतपेटीतून कौल द्यावा लागेल, अशी चिन्हं आहेत अर्थात् तो विधानसभासाठी असेल.

जनता पक्ष सत्तेवर आल्यावर बहुमत मिळालेल्या राज्यातल्या विधानसभा मुदतीपूर्वी विसर्जित करून त्यांनी निवडणुका घेतल्या होत्या. आता कॉंग्रेस ( आय ) हाच धडा गिरवल्याशिवाय राहणारा नाही. कॉंग्रेस ( आय ) व्यतिरिक्त इतर पक्षाची सरकारं असलेल्य राज्याच्या ( पश्चिम बंगाल वगळून ) विधानसभा विसर्जित करून इंदिराजी नव्यानं जनतेचा कौल घेतील. आपल्या सवयीच्या डावपेचानी पक्षातरं घडवून आणून असलेली सरकारं पाडायची नि निवडणुका न घेता आपल्या पक्षाची सरकारं आणायची असा प्रयत्नही महाराष्ट्रासारख्या काही राज्यात त्या करून पाहतील. पण ते यशस्वी न झाल्यास विधानसभा-विसर्जनाचा मार्ग त्या अवलंबतील. तेव्हा मतदारांनी जागरूकपणे मतदान केलं पाहिजे. उदासीन राहून चालणार नाही

वृत्तपत्रीय प्रचारमाध्यमाना आणि विचारवंतांनी अधिक प्रभावी भूमिका यापुढे बजावावी लागेल. कारण या निवडणुकीत देशातली बहुसंख्य वृत्तपत्रं बाईंच्या विरुद्ध होती. तरीही त्याचा फारसा परिणाम जनमानसावर घडलेला नाही, हे विचार करण्यासारखं आहे. जनमत घडविणाऱ्या घटकात वृत्तपत्राचं स्थान मोठं मानलं गेलं आहे. पण दिवसेंदिवस हा प्रभाव कमी होताना दिसतो आहे. तसंच जनमानसाची नाडीही यावेळी वृत्तपत्राना ओळखता आलेली नाही. या दोन्हीची दखल घेऊन वृत्तपत्रानी आपली जबाबदारी आता पेलली पाहिजे. सत्ताधीशाच्या भजनी लागण्याची वृत्तपत्राची प्रवृत्ती वाढती दिसते. लोकशाही कर्तव्य म्हणून काही वृत्तपत्रं मानत असतील तर त्यानी सत्तारूढ पक्ष वा व्यक्ती बदलताच त्याच्या भजनी लागण्याची

प्रवृत्ती ठेवता कामा नये. आपली जी असेल ती भूमिका ठाम ठेवली पाहिजे.

साहित्यिक, विचारवंतांचाही समाजावरचा प्रभाव क्षीण असल्याचं या निवडणुकीनं दाखवून दिलं आहे म्हणूनच या मंडळीनीही समाजाबरोबरच्या आपल्या सुसवादाचा एकदा विचार करणं आवश्यक आहे जनजागृतीत त्यानाही वृत्तपत्राइतका नसला तरी महत्त्वाचा वाटा उचलावा लागणार आहे. अर्थात् तशी काही बांधिलकी ( दुर्गाबाई भागवत, पु. ल. देशपांडे, विद्याधर पुंडलिक या चार-दोन साहित्यिकांनी मानली तशी ) ही मंडळी मानत असतील तर !

हे सर्व करणं आजही आवश्यक आहे, नव्हे, आज त्याची जास्तच गरज निर्माण झाली आहे. कॉंग्रेस ( आय ) ला मिळालेलं बहुमत पाहता आणि इतर प्रवाहाचा विचार करता याचं महत्त्व लक्षात येईल. कारण इंदिरा गांधीची राजवटही फार काळ टिकणारी आहे, असं एकूण चिन्ह पाहता वाटत नाही.

कॉंग्रेस ( आय ) ला बहुमत लाभलं आहे, ही गोष्ट खरी आहे. पण त्यात चांगले संसदपटू, कुशल प्रशासक फार थोडे आहेत, ही वस्तुस्थिती आहे. इंदिरा गांधीचे प्रख्यात चिरंजीव संजय गांधी यांचे कमलनाथ, जगदीश टायटलर यांच्यासारखे सन्मित्र शंभर-सव्वाशेच्या आसपास आहेत बन्सीलाल, विद्याचरण शुक्ल आदी मंडळी भोवती आहेतच. ' के. जी. बी. चे एजंट ' म्हटले गेलेले हेमवतीनंदन बहुगुणा यांची नवी भर त्यात पडलेली आहे. ही सर्व मंडळी साधी-सुधी नाहीत, हे सर्वश्रुतच आहे. इंदिराजी त्याना एकत्र कस सांभाळतात, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

बहुगुणा आज राजकीय गरज म्हणून बाईंच्या गोटात आले असले तरी बाई त्यांना आणि ते बाईंना पूर्णपणे ओळखून आहेत ' भारताचा पंतप्रधान ' होण्याची स्वप्नं एकेकाळी बहुगुणा बघत होते. रशियाचा त्यांच्या या स्वप्नाला आशीर्वाद होता, असं बोललं जातं. बाई तेव्हा पंतप्रधान होत्या. बाईंना याचा सुगावा लागताच बहुगुणांचं वर्चस्व त्यांनी संपुष्टात आणलं होतं. आजही त्यांना आपल्या पक्षाचे ' महासचिव ' केल्यानंतर बाईंनी पुन्हा तेच धोरण अवलबलं आहे, असं बाईंच्याच काही निकटवर्तीयाचं म्हणणं आहे. हे सर्व पाहता बहुगुणासारखा कुटिल, धनिक राजकारणी शांत बसण्याची शक्यता कमीच वाटते. आज ना उद्या ते उचापतींना प्रारंभ केल्याशिवाय राहणार नाहीत. त्यावेळी पक्षांतर्गत कुठल्या गटाची ' फेरजुळवणी ' ते करतील, हे आजच सांगणं अवघड आहे पण चार कुटिल, महत्त्वाकांक्षी मंडळीना मदभेद विसरून जवळ यायला फार वेळ लागत नाही, हे एक सत्य आहे.

## खरा विरोध-खरी आव्हानं

अर्थात बहुगुणा उपद्‌व्यापी असले तरी बाईंचे मुख्य स्पर्धक किंवा विरोधक ते नाहीत. बाईंना खरा विरोध होणार आहे तो स्वत.च्या सुपुत्राकडून, संजयकडूनच हा महत्त्वाकांक्षी नवोदित नेता सत्तेसाठी विधिनिषेध बाळगेलच, याची हमी देणं कठीण आहे. एक तर त्याच्यामागे आज संख्याबळ आहे आणि दुसरं म्हणजे पुरेशा कारवाया करण्याचं सामर्थ्यही आहे. त्याबरोबरच बन्सीलाल, विद्याचरण शुक्ला याची साथही त्याला लाभेल.

संजयचा दुसरा एक गुणही लक्षात घेण्यासारखा आहे. गेल्या तीन वर्षांत जो त्रास बाईंना सहन करावा लागला तसाच संजय, बन्सीलाल, विद्याचरण यांनाही सहन करावा लागला आहे. ' विरोधकाच्या बाबतीत सूडाचं धोरण ठेवणार नाही ', असं आश्वासन बाईंनी दिलं आहे. त्यावर विश्वासून राहता येईलच असं नाही. पण निदान उतावळेपणानं तरी कोणतीही कृती त्या करणार नाहीत. सयपणानं त्यांची वाटचाल सुरू राहील आणि एकदम केव्हा तरी अनपेक्षितपणे प्रहार करतील, अशी इंदिराजीची आजवरची कारकीर्द सांगते. पण संजयचं तसं नाही. ' बाते कम, काम ज्यादा ' या तत्त्वानं तो नको तितकं काम करील. त्यातही त्याला संयम राखता येणं अवघड आहे. त्यानं राखला तरी त्याचे मित्र राखतीलच असं नाही आणि या कारवायातून जनमानस पुन्हा एकदा विरोधी दिशेनं वाटचाल करायला लागेल, असा अंदाज आहे.

–आणि त्याला पंतप्रधान करायची बाईंची इच्छा आता फारशी गुप्त राहिलेली नाही. त्या हा प्रयत्न करतील तेव्हाही बंडाला तोंड फुटल्याशिवाय राहणार नाही.

अर्थात हे काही इंदिराजीपुढचे तातडीचे प्रश्न नव्हेत. तातडीचे प्रश्न आहेत ते आर्थिक, सामाजिक आणि कायदा-सुव्यवस्थेबद्दलचे, सीमेवरच्या अशांत स्थितीचे. त्यात त्यांना लगेच लक्ष घालावं लागेल.

केवळ जनता पक्षांतर्गत भांडणामुळेच जनतेनं इंदिराजींना बहुमत दिलेलं नाही, तर हे प्रश्न सोडविण्यात जनता पक्षाला आलेल्या अपयशानंही जनतेला पुन्हा इंदिराजींकडे धाव घ्यायला लावली आहे. फार मोठ्या अपेक्षा मनाशी बाळगून जनतेनं त्यांना प्रचंड कौल दिला आहे. विशेषत: भाववाढ आणि देशातली अशांतता–दंगली यानी जनता ग्रस्त झाली आहे. हे प्रश्न बाई चुटकीसरशी सोडवतील, अशी जनतेची अपेक्षा आहे. त्याबाबत त्या खंबीर पावलं उचलतील आणि जनतेला दिलासा देतील, हे निश्चित. पण हे प्रश्न जादू केल्यासारखे झटपट सोडवणं त्यानाही शक्य नाही संपूर्ण अर्थव्यवस्था आणि प्रशासनयंत्रणा सावरून पूर्वपदावर आणायला काही कालावधी निश्चितच लागेल. पण तोपर्यंत जनतेच्या अपेक्षा टिकवून धरण्याची अवघड कामगिरीही त्यांना पार पाडावी लागेल.

कोणतेही प्रश्न सोडविण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी इंदिराजी पुन्हा आणीबाणी आणण्याच्या वाटेला जातील, अस वाटत नाही. जनतेनं १९७७ मध्ये आणीबाणीविरुद्ध दिलेल्या स्पष्ट निर्णयातून त्यांनी योग्य तो बोध घेतला आहे. यावेळचा जनतेचा पाठिंबा आणीबाणीसाठी नाही, हेही त्यांना सहज समजण्यासारखं आहे. म्हणूनच तसा धोका पत्करून, आंतरराष्ट्रीय पातळीवर डागाळली गेलेली आपली प्रतिमा आणखी डागाळण्याच्या वाटेला इंदिराजी जाणार नाहीत. उलट आणीबाणी–प्रतिमा घालविण्यासाठी अधिक संयमानं आणि सावधतेनंच त्या पावलं टाकतील.

ही आहे आजची स्थिती !

१९८० च्या जानेवारीतल्या पहिल्या आठवड्यात झालेल्या सातव्या लोकसभेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतरच्या पहिल्याच आठवड्यातली. बाई दिल्ली तख्तावर विराजमान झाल्या आहेत. पुन्हा एकदा त्यांची साद घुमली आहे, ' बहनो और भाईयों...'

या त्यांच्या हाकेत कसलं आश्वासन सामावलं आहे, कुणास ठाऊक !

□

रंगभूमी । मिलिंद कोकजे

**‘ लोककथा ’७८ ’च्या संदर्भात**

# सामाजिक चळवळ आणि रंगभूमी

मराठवाड्यामधे मध्यंतरी ‘ मराठवाडा-विद्यापीठ ’ नामातराच्या प्रश्नावरून एक फार मोठी चळवळ उभारली गेली. मराठवाड्यामधे किंवा संपूर्ण देशात अशा प्रकारे उभारली गेलेली ही काही पहिलीच चळवळ नव्हे. निरनिराळ्या सामाजिक प्रश्नांवर उभारलेल्या चळवळी ठिकठिकाणी सातत्याने चालूच असतात. या सामाजिक चळवळीचे पडसाद समकालीन कलेवरही उमटत असतात. रंगभूमी, चित्रपट यासारख्या प्रयोगनिबद्ध ( performing ) कलामाध्यमांमधे तर हे पडसाद फारच प्रकर्षाने उमटतात. चित्रपटाच्या बाबतीत अलीकडचे उदाहरण म्हणजे, सहकारी चळवळ आणि त्यातील प्रश्न घेऊन केलेली ‘ मंथन ’ची निर्मिती. कलेमधे जरी अशा प्रकारे मोठ्या सामाजिक प्रश्नाचे, चळवळीचे, एखाद्या जाती-जमातीच्या, गटाच्या आर्थिक, सामाजिक प्रश्नाचे पडसाद उमटले तरीही ज्या लोकाचे हे प्रश्न असतात त्याच्यापर्यंत मात्र कलेचे ते रूप पोचत नाही. १ जानेवारी १९८० रोजी शंभरावा प्रयोग सादर केलेल्या ‘ लोककथा ७८ ’ या नाटकाने मात्र अशा प्रकारचा प्रयत्न मध्यंतरी केला.

अलीकडच्या काळात हौशी रंगभूमीवर शंभरावा प्रयोग सादर करीत असलेले ‘ लोककथा ७८ ’ हे तिसरे नाटक. पहिली दोन अर्थातच ‘ जुलुस ’ आणि ‘ पाहिजे जातीचे ’. आणीबाणीच्या काळात ‘बहुरूपी’ने जुलुसचे अनेक प्रयोग छोटी छोटी सभागृहे, मोकळी मैदाने, घराच्या गच्च्या यावर केले. रंगमंचाबाबतच्या सर्व मर्यादा जरी ‘जुलुस’ने तोडल्या तरीही शहरे व शहरी प्रेक्षक याच्या मर्यादा तोडणे ‘ जुलुस ’ला शक्य झाले नाही. ‘ लोककथा ’ने ‘ जुलुस ’च्या पुढे एक पाऊल जाऊन रंगभूमीच्या सर्व साकेतिक मर्यादा तर तोडल्याच आणि ते शहराच्या कक्षा तोडून खेड्यापर्यंत जाऊन पोचले.

तेरा महिन्याच्या अल्पकाळात झालेले ‘ लोककथा ’चे शंभर प्रयोग विविध थरातील लोकानी पाहिले ( अगदी पृथ्वी थिएटरच्या पॉश, अमराठी प्रेक्षकांपासून, वरळी बी. डी. डी. चाळीतील रहिवाश्यापर्यंत. ) या वेगवेगळ्या थरातील लोकांना हे नाटक वेगवेगळ्या कारणांसाठी आवडले. कुणाला एक वेगळाच थिएटर फॉर्म ( आकारबंध ) म्हणून तर कुणाला त्यातील सामाजिक आशयामुळे. पुण्यातील तेरे देस होम्स आणि युवक क्रांती दलाच्या कार्यकर्त्यांना सामाजिक आशय आणि सध्याच्या ज्वलंत प्रश्नाला ( रंगभूमीच्या माध्यमातून ) केलेला स्पर्श यामुळे नाटक फारच आवडले. त्यांनी सहकार्याने २ ते १७ ऑक्टोबर या काळात मराठवाड्यामधे १६ प्रयोगांचा एक दौरा आयोजित केला. या दौऱ्यात औरंगाबाद, जालनासारख्या शहरापासून सोनवती, कुमट्यासारखी जाण्यायेण्यासाठी रस्ते नसलेल्या तीन-चार हजार लोकवस्तीच्या खेड्यांचा समावेश होता. या दौऱ्यामधे ज्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या, प्रेक्षकाचा जो प्रतिसाद मिळाला, ज्या चर्चा झाल्या ते सर्व पाहिले की या दौऱ्याचे शंभर टक्के यश आणि सामाजिक प्रश्न, चळवळ आणि रगभूमी याच्यातील दृढ होणारे नाते निदर्शनास येते.

हे सोळा प्रयोग युक्रादने मराठवाड्यामधे मुख्यतः वर्गव्यवस्थेविरुद्ध व इतर काही प्रश्नावर उभारलेल्या चळवळीला मदत व्हावी या हेतूने आयोजित करण्यात आले होते. एखाद्या जोमदार सामाजिक चळवळीला, कार्याला रंगभूमीचा उपयोग होऊ शकतो का ? या प्रश्नाचे उत्तर इथे मिळणार होते. लोकांच्या उपस्थितीपासूनच या प्रश्नाचे उत्तर मिळू लागले. छोट्या छोट्या खेड्यामधे प्रत्येक ठिकाणी दीड ते दोन हजारांहून जास्त प्रेक्षक उपस्थित होते. अणदूरला तर विक्रमी उपस्थिती होती. तेथे सहा-सात हजाराचा जनसमुदाय जमला होता. खेड्यामधे स्त्रियाची उपस्थिती पस्तीस ते चाळीस टक्के इतकी होती. कार्यकर्त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सभा, मेळावे यांना घराबाहेर न पडणाऱ्या बायका नाटकाच्या आकर्षणाने प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात एकत्र आल्या आणि विशेष म्हणजे गावातील ज्या ठिकाणी बायका जात नसत तेथे प्रयोग करूनसुद्धा बायकानी एवढा उत्साह दाखविला. सामाजिक चळवळीमधे यापुढे रगभूमीचे स्थान काय राहणार आहे हेच यावरून दृष्टोत्पत्तीस येते.

‘ लोककथा ७८ ’च्या पहिल्याच प्रयोगाच्या वेळी प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकामधे या ( खेड्यात प्रयोग करण्याच्या ) वेगळ्याच प्रयोगाची बीजं दिसतात. ब्रेख्टच्या नाट्यविचाराची ओळख करून देणाऱ्या या पत्रकात म्हटलं होतं, ‘ ब्रेख्ट कोण होता ? जनतेचा नाटककार ! लोकासाठी लोकाची नाटके लिहिणारा ! गाजलेली, धूर्त, उद्ध्वस्त, झगडणारी माणसं, नाना कळाची. पण स्वत.च्या मातीतील माणसं रंगविणारा होता. ’ पहिल्या महायुद्धानंतर १९२० च्या आसपास ब्रेख्टने त्याचे प्रयोग सुरू केले, तेव्हा त्याची समाजातील दलित, उपेक्षित, श्रमकरी, मजूरवर्गाची अस्मिता, मानवी हक्काविषयीची जाणीव तीव्र होती. हे प्रयोग करताना त्याच्या एपिक थिएटरविषयीच्या काही मूलभूत संकल्पना–नाटकाला कोर्ट खटल्याचे स्वरूप देऊन निकाल प्रेक्षकावर सोपविणे, प्रेक्षकाची नुसतीच प्रतिक्रिया न देता त्याना विचार करायला लावणे, गतिमान सामाजिक जाणीवेतील अथवा घडामोडीतील मूलभूत आणि सापेक्ष असे प्रश्न हाताळणे, शोभून दिसेल असे संगीत न वापरता जे विसंगत वाटेल असे संगीत वापरणे, अशा होत्या. आपल्या नाट्यप्रयोगांमधे रंगमचाची सजावटही ब्रेख्टला नको होती. कारण वास्तवाभास करणाऱ्या नेपथ्यरचनेमुळे प्रेक्षकाला जागीच खिळवून आश्चर्यचकीत करणे ब्रेख्टला नको होते.

१९२० च्या आसपास ब्रेख्टने केलेले प्रयोग आज आपल्याकडे केले जात आहेत ह्यालाही एक विशिष्ट कारण आहे. त्यावेळी पश्चिमेकडे निर्माण झालेली वर्गविद्रोहाची जाणीव आपल्याकडे आजच्या इतकी तीव्र नव्हती किंबहुना अजीबात नव्हती. जीवनाच्या विविध क्षेत्रांत आपला समाज दोन टोकावर उभा आहे. समाजातल्या या दोन टोकाची जाणीव झाली की, बंडखोरी वृत्ती निर्माण होते आणि त्यातूनच सामाजिक चळवळी आकार घेतात. त्याचेच पडसाद मग कलेच्या क्षेत्रात उमटू लागतात.

लोककथेच्या बाबतीतही मला वाटते काहीसे असेच झाले असावे. ब्रेख्टच्या मराठी रूपातरावरील समीक्षा वाचताना मतकरीना जाणवले की, ब्रेख्ट मराठीत आणायचा तर त्याला जसाच्या तसा उचलून का आणावा ? त्याचा मोकळा फॉर्म आपल्याकडच्या सामाजिक सदर्भात यायला हवा. नाटक बघणे यापेक्षा अनुभवणे हे जास्त प्रमाणात व्हायला हवं. त्याच वेळी दलितांवरील अत्याचाराच्या बातम्या वाचल्यानंतर त्या अशा मोकळ्या फॉर्ममधून हॅपनिंगच्या अंगाने प्रेक्षकाना अनुभवायला लावल्या पाहिजेत असे मतकरीना वाटू लागले आणि त्यातूनच लोककथेची निर्मिती झाली.

इथेही एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती ही की, ब्रेख्टचा मोकळा फॉर्म, हॅपनिंग,

नाटक अनुभवणे या सर्वांवर विचार करून प्रत्यक्ष निर्मितीच्या वेळी मतकरीवर प्रभाव पडला तो मराठवाडा दंगल व त्याआधी घडलेल्या बऱ्याच घटनांनी निर्माण केलेल्या सामाजिक प्रश्नांचा, चळवळीचा इथेही मतकरी व त्यांची रंगभूमी सामाजिक प्रश्न व त्यातून निर्माण होणारी चळवळ यापासून अलग होऊ शकले नाहीत.

लोककथेची निर्मिती करणाऱ्या 'सूत्रधार'ने अतिम फेरीतील प्रयोगाचे वेळी सामाजिक संस्थांना आणि कार्यकर्त्यांना त्याच्या कार्यात या नाट्यप्रयोगाने काही मदत करता येण्यासारखी असेल तर ती करण्याचे आश्वासन दिले. 'सूत्रधार'ने ठिकठिकाणी प्रयोग करून हे आश्वासन पाळलेही. पोद्दार महाविद्यालय आणि लातूरला विषमता निर्मूलन शिबिरात, १ मे रोजी कामगारांच्या जाहीर सभेत आणि वरळी बी. डी. डी. चाळीत. नांदेडला अत्यल्प प्रवेश दरासह एका शाळेच्या छोट्या सभागृहात मराठवाड्यामधले नुकतेच केलेले १६ प्रयोग हे मला वाटतं या १०० प्रयोगामधले सर्वांत महत्त्वाचे प्रयोग आहेत. कारण ज्या लोकांचे हे नाटक आहे, त्या लोकांपर्यंत ते या प्रयोगांद्वारे पोचले. या सर्वच प्रयोगांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. पोद्दारमध्ये प्रयोग संपताना जोरजोरात घोषणा दिल्या गेल्या, तर लातूरला घोषणांप्रमाणेच डॉ. आढावांची 'शंभर भाषणांपेक्षा अधिक प्रभावी' ही प्रतिक्रिया महत्त्वाची ठरली. कामगार मैदान आणि बी. डी. डी. चाळीतील प्रयोगानंतर झालेला टाळ्यांचा कडकडाट किती वेळ थांबेचना. मराठवाड्यामधील प्रयोगांच्या उपस्थितीबद्दल मी आधीच लिहिले आहे, पण तेथील प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया रंगभूमीवरील सर्वच कलाकारांचा उत्साह द्विगुणीत करणाऱ्या आहेत. लोकांच्या या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी मराठवाड्यामधील युवक कार्यकर्त्यांची एक सभा 'तेरे देस होम्स'ने पुण्यात आयोजिली होती, त्या वेळी या कार्यकर्त्यांनी आपापले अनुभव सांगितले.

वीरगावच्या लोकांना हे नाटक इतके खरे वाटले की, युक्रांदच्या कार्यकर्त्यांनी आपल्याकडच्या घटनांचा अभ्यास करून मुद्दाम हे नाटक लिहून घेतले असावे असा त्यांनी अंदाज केला. (शहरी मध्यम वर्गीय अस्सल ग्रामीण प्रश्नावर लिहू शकणार नाहीत या टीकेला एकापरीने हे उत्तरच) बहुतेक ठिकाणच्या लोकांना शेवट वेगळा हवा होता असं वाटलं. पीडितांना न्याय द्यायला हवा होता असं त्यांचं मत. त्यांच्या मनात ही इच्छा निर्माण होणे हाच या नाटकाचा हेतू होता, तो पूर्ण यशस्वी झाला. अनेक गावांशी संपर्क असलेल्या एका कार्यकर्त्याने सांगितले की, हा आकारबंध (फॉर्म) लोकांना नवीन आणि आकर्षक वाटला. त्यात ते इतके रंगून गेले की, छबिलदासच्या प्रेक्षकाप्रमाणे सावित्रिकडून पत्रक घ्यायला हात पुढे करून मार्यामिंग पूर्ण केले. तो आपल्या जीवनाचा आरसा आहे असेच त्यांना वाटले. चर्चा, भाषणे, मासिकांमधील लेख यापलीकडे हे माध्यम अधिक लोकांपर्यंत पोचते आणि विरोधी पक्षाला हे काही अंशी खटकले देखील. नामांतर आंदोलनानंतर दलित व सवर्ण यांच्यामध्ये मोठी फूट पडली असून 'गरीब तेवढे एक' या तत्त्वावर ही चळवळ उभी राहू शकत नाही. सवर्ण व दलित गरिबांमधला हा तुटलेला संवाद साधण्यासाठी अशा प्रकारच्या नाटकाचा निश्चित उपयोग आहे. नाटक पाहून अनेक गावांमधून लोकसमित्या स्थापन करण्याची मागणी कार्यकर्त्यांपुढे येत आहे. काही ठिकाणी अशा समित्या स्थापनही झाल्या आहेत. ज्या लोकांच्या प्रश्नावर नाटक उभारलेले असते त्या लोकांसमोर ते सादर केल्यास चळवळीला ते कसे साहाय्यभूत ठरू शकते याचे हे उत्तम उदाहरण होय.

मराठवाड्यातील या दौऱ्याचा आणखी एक हेतू म्हणजे ग्रामीण रंगभूमी निर्मितीला चालना देणे हा होता. वीरगावला तेथील मुलांनी गावात घडलेल्या घटनांवर एक नाटक सादर केले. संहितेशिवाय सादर केलेला तो प्रयोग चारसाडेचार तास चालला खऱ्या अर्थाने तो एक उत्स्फूर्त नाट्याविष्कार (इंप्रोवायजेशन) होता.

उदगीरच्या एका कार्यकर्त्याने सांगितले की, नाटक करण्यासाठी फार मोठी साधनसामुग्री लागते ही चिंता आमच्याकडच्या मुलांना राहिलेली नाही. (ब्रेख्टच्या मराठीत आणलेल्या मोकळा फॉर्मचं तर हे यश नव्हे ?) मध्यंतरी एका 'घरणा' कार्यक्रमात या तरुणांनी लोककथेवरून स्फूर्ती घेऊन एक पाच मिनिटाचे नाटुकले बसविले आणि ते स्ट्रीट प्ले सारखे चौकाचौकात केले.

वीरगाव किंवा उदगीरच्या या मुलांमधूनच उद्याची ग्रामीण रंगभूमी कदाचित निर्माण होईल. खऱ्या अर्थाने निर्माण झालेली ही ग्रामीण रंगभूमी ८८ साली लोककथा घेऊन सामाजिक चळवळींमधे आजच्याहून जास्त महत्त्वाची भूमिका बजावेल.

वर्गव्यवस्था गेली हजारो वर्षे अस्तित्वात आहे. मागच्या पिढीला चाललाय ते बरोबर आहे असेच वाटले, सामाजिक चळवळीबरोबर वहात जाणाऱ्या आजच्या पिढीला ७८ ची लोककथा पाहून असं होऊ नये असं वाटते आणि त्या दृष्टीने ही पिढी प्रयत्न करते. पुढची पिढी '८८ सालची लोककथा' पाहून वर्ग व्यवस्थाच कदाचित बदलून टाकेल. सामाजिक चळवळीमधे रंगभूमी बजावत आलेली महत्त्वाची भूमिका पाहून हा केवळ आशावाद उरणार नाही असा विश्वास वाटतो.

बादल सरकार हे नाव आता खूपच परिचित आहे. बंगाली जनतेचे प्रश्न घेऊन ते कलकत्त्यातील रस्त्यावर रंगभूमीच्या माध्यमातून माडण्याचा प्रयत्न श्री. सरकार व त्याचे सहकारी करीत असतात. नुकताच बंगालमधील लोड शेडिंगच्या प्रश्नावर त्यांनी त्यावर सादर केलेल्या स्ट्रीट प्लेबद्दलचा श्री. सतीश नाईक यांचा वृत्तांत माझ्या वाचनात आला. मराठीला असा एक बादल सरकार आणि उत्पल दत्त हवे आहेत अशी मागणी नाईक यांनी शेवटी केली आहे मला वाटते मुंबईच्या नाट्य विश्वात या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. मुंबईतील विद्यार्थ्यांच्या एका गटाने लोकांमध्ये निवडणुकीच्या दृष्टीने राजकीय जागृती करण्यासाठी आणि आपले प्रश्न सामान्यांपर्यंत पोचावेत या हेतूने दोन एकांकिकांची निर्मिती करून त्याचे प्रयोग रस्त्यारस्त्यावर करण्यास सुरुवात केली आहे, मुंबई, पुण्याच्या नाट्यविश्वात ही एक महत्त्वाची घटना ठरावी –

ब्रेख्टच्या काही मूलभूत संकल्पना, मराठीमध्ये आणलेला त्याचा मोकळा फॉर्म, आजच्या युवकाच्या बदलत्या सामाजिक जाणिवा व त्यासाठी कला माध्यमाचा वापर करण्याची प्रवृत्ती आणि मतकरीसारख्या ज्येष्ठ दिग्दर्शकाची 'तंत्राचा बडेजाव कमी करून, प्रामाणिक विचार सरळपणे रंगमंचावर माडण्याची, रंगभूमीला आपल्या भूमीचा नैसर्गिक रंग चढविण्याची' संकल्पना यामधूनच 'लोककथा ७८' किंवा स्ट्रीट प्लेसारखे प्रयोग मराठीतही सातत्याने होऊ लागतील, ग्रामीण रंगभूमीचीही वाढ होईल आणि रंगभूमीवरील तंत्राचा बडेजाव कमी होऊन हौशी व प्रायोगिक रंगभूमी आपल्या चाकोरीतील प्रेक्षकवर्ग सोडून सामान्यापर्यंत जाऊन पोहोचेल. जसजशा या गोष्टी अधिक प्रमाणात होतील तसतसे सामाजिक चळवळीत आणि कार्यात रंगभूमीचे स्थान अधिकाधिक महत्त्वाचे होत जाईल. □